# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०३-०२-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक ०३ फेब्रुवारी २०१५ (का.प.क्र.३७) मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १-१५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन,आयएएस,नगर सचिव श्री. एम.ए पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. विजय लक्ष्मण वाघचौरे
३. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
४. स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२०. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२१. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२२. स.स.श्री.शिंदे राजू रामराव

२३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२४. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२५. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२६. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
२७. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
२८. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२९. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३०. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३१. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३२. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३३. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३४. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३५. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३६. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३७. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३८. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३९. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४०. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४३. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४४. स.स.डॉ. खान जफर अहेमद
४५. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४६. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
४७. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४८. स.स.श्री.खान आगा मिया खान
४९. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५०. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५१. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५२. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे

५३. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
५४. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
५५. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
५६. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
५८. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५९. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६०. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६२. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६३. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६५. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६६. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
६७. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर
६८. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७०. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७१. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
७२. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७५. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७६. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडिराम
७७. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
२. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
**३.** श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.प्रफुल्ल मालाणी :जगप्रसिध्द व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मणराव यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.समीर राजूरकर :यास माझे अनुमोदन आहे. तसेच जेष्ठ शिक्षण तज्ञ व रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्व. रावसाहेब शिंदे यांचे निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.सुशिल खेडकर :यास अनुमोदन आहे. तसेच चि.मयुरेश या मुलाचे निधन झाले त्यासही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.संजय केनेकर : यास अनुमोदन आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :जे श्रध्दाजंली अर्पण करण्या बाबत नावे सुचवली त्यास अनुमोदन आहे.

डॉ. जफर खान : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

यावेळी स्व. आर.के.लक्ष्मणराव तसेच रावसाहेब शिंदे चि.मयुरेश यांचे निधन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.किशोर नागरे :गेल्या २७ तारखेच्या डीपीडीसीच्या बैठकीत राज्याचे पर्यावरण मंत्री तसेच या जिल्हयाचे पालकमंत्री यांनी महानगरपालिकेसाठी ७.५० कोटीची तरतुद उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :यास अनुमोदन आहे. तसे पत्राने त्यांना लेखी कळवावे.

श्री.संजय केनेकर :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :या जिल्हयाचे पालकमंत्री मा.श्री.रामदासजी कदम यांनी डीपीडीसीच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी ७.५० कोटी रक्कम उपलब्ध करून दिली त्याबध्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.पंकज भारसाखळे :काल महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष मा.श्री.हरीभाऊ बागडे यांचे समवेत मा. श्री.विनोद तावडे यांनी बैठक घेवून मराठवाडा क्रिडा मंचचे अध्यक्ष श्री.बोराळकर यांचे नेतृत्वाखाली साई क्रिडा सेंन्टर यास नॅशनल दर्जा देण्याचे मान्य केले त्यामुळे मा.ना.श्री. हरीभाऊ बागडे मा. ना.विनोद तावडे तसेच श्री.शिरीष बोराळकर यांचे अभिनंदन करावे.

श्री.संजय केनेकर :साई क्रिडा या संस्थेला केंद्रीय दर्जा देण्याचे काम झाले त्यामूळे मराठवाडयातून विविध खेळाचे कार्यक्रम या संस्थेच्या माध्यमातून होतील हा निर्णय मराठवाडयासाठी अभिमानास्पद आहे. त्यामूळे मा.ना.श्री.विनोदजी तावडे तसेच युतीतील सर्व मा. मंत्रीमहोदय व विधान सभेचे अध्यक्ष मा.ना.हरीभाऊ बागडे या सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.मीर हिदायत अली :महानगरपालिकेचे क्रिकेट टिम फायनल मध्ये जिकंले या टिमला महापालिकेच्या माध्यमातून कोणतीही मदत केली नाही सर्वाचे अभिनंदन करावे.या खेळाडूंना साहित्य व आर्थीक मदत करावी.

मा.महापौर :आताच स.सदस्यांनी नावे सुचविल्यानुसार मा.श्री.विनोद तावडे मा.हरीभाऊ बागडे यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

श्री.समीर राजूरकर :सन २०१५ चा सुधारीत विकास आराखडा शासनाचे उपसंचालक नगररचना विभागाने तयार केला व सादर केला जो की पुढील १० वर्षासाठी तो विकास आराखडा असणार आहे.वृत्तपत्रात बातम्या आल्या की या विभागातील उपसंचालक पदावरील अधिकारी यांच्या सतत बदल्या होतात.घाईगरबडीत अहवाल सादर करून तो मंजूर करून घेणार हे घाईघाईत होऊ नये डीपी

प्लॅन तयार केला तेंव्हा ६ महिण्यापुर्वी कोणते अधिकारी त्या विभागात होते नंतर कोणते अधिकारी आले व आता कोणते अधिकारी या आहे. खुलासा घेण्यात यावा.

सहा.संचालक(न.र) :साधारणतः २-३ वर्ष श्री.नाजेरकर म्हणून शासनाने अधिकारी नियुक्त होते.१९९१ जो विकास आराखडा आहे त्यास साधारणत:२०१० साली मंजूरी दिली आहे. ६-८ महीन्यापासून श्री.रजाखॉन म्हणून उपसंचालक नगररचना म्हणून काम करीत आहे. त्यांची ही ३१ जानेवारी रोजी बदली झालेली आहे असे समजले आता त्यांचे जागेवर रहातेकर उपसंचालक नगर रचना पदावर रुजू होणार आहेत.

श्री.समीर राजूरकर :सुधारीत विकास आराखडा महापालिकेच्या मंजुरी शिवाय पुढील कार्यवाही होवू शकत नाही. एक्झेस्टिंग लँड युज आतापर्यत सभागृहासमोर आणले नाही. विकास आराखडा आणण्याची घाई होत आहे. ३५ दिवसाची मुदत आहे. २० फेब्रुवारीच्या आत तो प्लॅन आणून देतील त्याचे एक्झेस्टिंग लँड युज माहित नाही. तो आता न आणता नवीन बॉडी अस्तित्वात येईल त्यावेळी सादर करावा.

श्री.खाजा शरफोद्दीन :सुधारित विकास आराखडा नियमानुसार सादर केलेला आहे का ?

श्री.काशिनाथ कोकाटे :सुधारीत विकास आराखडा तयार करीत असतांना कोणत्या कालावधीत काम केले.जेथे प्राधिकृत ,स्थानिक स्वराज्य संस्था आहे काम करीत असतांना जाहीर नोटी-फिकेशन काढले पाहिजे स.सदस्यांना शंका आहे की, नियमात तरतुद नाही. सभागृहाचा अधिकार डावलला जाईल. डीपी प्लॅनला या सभागृहाची मान्यता शिवाय शासन निर्णय घेता येत नाही.

श्री.समीर राजूरकर :संबधीत उपसंचालक यांनी सही करून सुधारीत विकास आराखडा महापालिकेकडे पाठवून दिला त्यांची बदली झाली ते पुणे येथे रूजू झ ााल्यावर विकास आराखडा मान्य होऊ शकत नाही. जुन्या अधिकाऱ्यांच्या सहीने आल्यावर मान्य करू नये.

श्री.प्रशांत देसरडा :जो डीपी प्लॅन होणार आहे तो शहरातील विकास योजनेच्या बाबतीत सर्वे चालू असतांना जमीन वापर काय आहे. आता मॅडम आल्याची माहिती दिली. शहराला दिशा देणारा प्लॅन आहे. जमीन वापर सर्वे साठी ज्या एजन्सीला दिले. ती सरकारी एजन्सी आहे. फक्त सर्वे घेतो आहे अशी सांगितले गेले परंतु नंतर कळले की ती सरकारी एजन्सी नव्हती डी पी प्लॅन तयार त्यावर संशय येतो अधिकारी किती बदलले तरी प्लॅन बरोबर यायला पाहिजे यलो,ग्रीन तक्रारी करून बदलले का? कालमर्यादा दिली का? विद्यमान जमीन वापर नकाशा किती दिवसात करून द्यायला पाहिजे होते. २ वर्षे झाले.

सहा.संचालक(न.र) :उपसंचालक नगररचना हे शासनाने नियुक्त केलेले आहे.पुर्णपणे त्यांचा अधिकार आहे महापालिकेच्या वतीने विकास योजना आराखडा तयार करीत आहे. माझा कंट्रोल नाही. महानगरपालिकेचा कंट्रोल आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या सभागृहाने, तसेच विविध पक्षाचे मा.आमदार मा.खासदार असेल यांनी काही सुचना केल्या होत्या कचरा डेपो पार्कींग, शाळा,दवाखाने स्मशानभुमी

व इतर काही संदर्भात सुचना केल्या त्याचा विचार होणार आहे की नाही महापालिकेचे त्यावर कन्ट्रोल असणार की नाही. काय चर्चा करणार.

श्री समीर राजूरकर :संबधीत अधिका-यांची बदली झाली त्यांनी मा.आयुक्तांकडे काही पाठवलं का?

श्री.प्रशांत देसरडा :विभागाचा कन्ट्रोल नाही महापालिकेचा आहे याचा अर्थ समजला नाही.

श्री.कृष्णा बनकर :यावर प्रशासनाचा कन्ट्रोल आहे का?

सहा.संचालक(न.र) :औरंगाबाद महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे.महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे २२(१) व ३१ या नुसार विकास योजना तयार करण्याचे अधिकार नियोजन प्राधिकरणाचे आहे नियोजन प्राधिकरणाने विकास योजना १९९१ ची निदान ३० वर्षामध्ये नवीन तयार केली पाहिजे या हिशोबाने अधिनियम १९६६ चे कलम ३८ अन्वये २०१० मध्ये इरादा जाहीर केला.आणि इरादा जाहीर केल्यानंतर शासनाचे उपसंचालक नगररचना हे अधिकारी हे आपल्याकडे नेमून दिला आहे.ते अधिकारी स्वतंत्ररित्या काम करतात.

श्री.कृष्णा बनकर :विकास योजनेत जमिनी आरक्षीत ठेवल्या जातात हे महापालिकेच्या संबधीत येत नाही का ?

श्री.प्रशांत देसरडा :अमुक एजन्सीने काम करावे सभेने ठरविले त्यांचे बरोबर महापालिकेने किती बैठका घेतल्या महापालिकेचे कन्ट्रोल असेल तर प्रशासक म्हणून मा.आयुक्त व संबधीत उपसंचालक यांचे समवेत किती बैठका झाल्या काय आढावा घेतला.

श्री.समीर राजूरकर :सुधारीत विकास आराखडा मान्यतेसाठी आलेला आहे का ?

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :विकास योजना आराखडा आलेला आहे काय आलेला नसेल तर चर्चा करून उपयोग नाही.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाचे जे अधिकारी श्री. रझाखान यांना किती अनुभव आहे व त्यांनी किती डी.पी प्लॅन तयार केले आहे.

डॉ.जफर खान :विकास आराखडा आलेला नाही त्यावर चर्चा करण्याची गरज नाही.

मा.आयुक्त :शहराचा डीपी प्लॅन बाबत चर्चा होत आहे श्री.खॉन नावाचे अधिकारी यांनी माझ्याशी भेट घेतली होती ते प्लॅन करण्याचे काम करीत होते. माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी कामे केलेले आहे परंतु आपल्याकडे सबमीट केलेले नाही.

श्री.संजय केनेकर :माझ्या माहिती प्रमाणे असे न सांगता खात्रीशीर खुलासा करायला पाहिजे हा विकास आराखडा प्लॅन महापालिकेडे आलेला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्लॅन आला, आपण दिलेल्या सुचनाचा विचार झाला नाही. यात करोडोचा नुकसान झाले. परस्पर मंजूरी दिली जात असेल तर योग्य नाही. आचार संहितेची वाट बघायची का?

डॉ.जफर खान :मा.आयुक्तानी खुलासा केलेला आहे.

मा.उपमहापौर :महानगरपालिकेचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तसेच झु विभागाचा मास्टर प्लॅन तयार आहे मा.महापौर यांना विनंती त्यांनी त्याचे विमोचन करावे.

या वेळी मा.महापौर यांचे हस्ते महानगरपालिकेचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तसेच झु-विभागाचा मास्टर प्लॅनचे विमोचन करण्यात आले.

या वेळी सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.विजय वाघचौरे :अहवालाचे विमोचन केले इंग्रजी भाषेत दिले आहे मराठीतून पुस्तक छापण्यात यावे.

मा.महापौर :मराठी भाषेतून याची प्रत दिल्या जाईल.

श्री.राजू शिंदे :स.सभापती यांना माहिती नाही जे प्रकाशन केले तो अहवाल कशाचा व कोणत्या भाषेत आहे हे योग्य नाही.

श्री.संजय केनेकर :प्रथम माहिती सभागृहाला दिली नाही. कशासाठी छापले.

यावेळी सभागृहात अनेक सदस्य बोलत असतात.

श्री.सुशिल खेडकर :मागच्या बैठकीत समुह संघटीका या पदाच्या बाबतीत चर्चा झाली होती आजच्या वृत्तपत्रात बातमी आलेली आहे.उपआयुक्त हे गैरसमज पसरवित आहे प्रशासनाला विश्वासात न घेता बातम्या देत आहे संबधीत उपआयुक्त श्री.पवार यांचेवर मा.आयुक्त काय कार्यवाही करणार आहे. त्यांना शासनाकडे परत पाठविण्याची कार्यवाही करावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खान :विकास कामावर चर्चा व्हावी.शहरात अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे झालेले आहे अनेकांचा अपघात होऊन मृत्यू होत आहे.खड्डे कधी बुजविणार आहे. पेपरला छापून येत आहे.

श्री.संजय केनेकर :वसुली होत नाही वसुलीसाठी एक महिना शिल्लक,वसुली नसल्याने विकास कामे होत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रशासनाला विश्वासात न घेता उपआयुक्त हे डायरेक्ट पेपरला कशी बातमी देवू शकतात त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :विदयापीठ गेट ते टाऊन हॉल पर्यतच्या रस्त्यावरील पॅचवर्कचे काम का होत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.सुशिल खेडकर :उपआयुक्त श्री.पवार यांनी सभागृहातील माहिती पेपरला दिली.प्रशासनाला विश्वासात घेतले नाही.मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :समुह संघटिका संदर्भात आयुक्तांनी गैरसमज पसरविला अशा बातम्या पेपरला आहे त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल व काही आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल.

यावेळी अनेक सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :२०० कोटीचा विषयाचे काय झाले?

मा.महापौर :वार्डात डांबरीकरणाची कामे चालू आहे ७.५० कोटीचे पॅचवर्कचे काम सुरू आहे कोणत्या वार्डात किती रक्कमेचे कामे केली सर्व माहिती दयावी.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

कार्य.अभियंता(ई-फ) :पॅचवर्कचे कामे सहा महिण्यापूर्वी करण्यात आली होती.त्यानंतर आता ३ महिन्यापासून काम सुरू केले. त्यात मोठमोठे रस्त्याचे पॅचवर्क चे काम हाती घेतले आहे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अनिल मकरिये :कोणत्या वार्डात पॅचवर्कचे कामे केली माहिती दयावी.

कार्य.अभियंता(ई-फ) :सेव्हनहिल पासून गजानन महाराज मंदीर पर्यतच्या रस्त्यावरील पॅचवर्क केले.

मा.महापौर :पॅचवर्कची कामे कोठे केली याची मा.आयुक्त व संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून माहिती दयावी.

श्री.संजय चौधरी :पॅचवर्क च्या कामाचे किती टेंडर आले होते टेंडर केंव्हा अंतिम झाले सर्व माहिती दयावी.

कार्य.अभियंता(ई-फ) :वार्ड वाईज टेंडर झालेले होते.

श्री.रेणुकादास वैद्य :दिशाभूल केली जाते.कुणाच्या वार्डात कामे झाली माहिती घ्यावी.

श्री.संजय केनेकर :कुठे कामे केली याची स.पदाधिकारी यांना कागदोपत्री माहिती दिली जात नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :डाबंरीकरणाच्या निविदा दोन प्रकारे काढण्यात आल्या बी-२ निवीदेमध्ये एकदा रस्ता झाल्यानंतर २-३ वर्ष त्या गुत्तेदारांनी त्या रस्त्याचे मेन्टनंस करायचे अशी पध्दत असते.ज्योतिनगर मध्ये २० लक्षचे काम बी-२ मध्ये केले ६ महिण्यात रस्ता खराब झाला.अनेकदा पत्र दिले ते पॅचवर्क केले नाही. कोणत्या वार्डातील रस्त्यावर पॅचवर्कचे कामे केली माहिती देण्यात यावी.

डॉ.जफर खान :बी-२ ची कामे कोणत्या भागात केली आहे.

श्रीमती सुनिता सोनवणे :कोठे पॅचवर्क केले पत्र दिले,माहिती दिली नाही काम चालू असतांना मध्येच सोडून दिले जाते ही पध्दत बरोबर नाही.

कार्य.अभियंता(ई-फ) :रेल्वेस्टेशनच्या प्लॅटफॉर्म व वार्ड ई मध्ये ज्या भागातून गणपती विर्सजन होते त्या रस्त्यावर पॅचवर्क केले.

श्री.प्रशांत देसरडा : पाहणी करावी व सदस्यांना माहिती दयावी आता विषयपत्रिका घेण्यात यावी.

मा.महापौर :ज्या ज्या भागात कामे झालेली नसतील पाहणी करण्यात येईल तेथील कामे करण्यात यावी जो पर्यंत काम करीत नाही तोपर्यत संबधीताचे बील थांबविण्यात यावे.

श्री.नासेर खान :४-५ मुद्यावर खुलासा केला त्यास प्रशासन सहमत आहे का जनतेच्या हिताचा खुलासा होत नाही निर्णय होतो त्याची अमंलबजावणी होत नाही. विकास काम होत नाही महापालिकेची यात बदनामी होत आहे. ५ हजार रक्कमेचे काम होत नाही माझ्या वार्डात ७० लाईट बंद आहे.ड्रेनेजचे काम झालेले नाही.

श्री.कृष्णा बनकर :वार्डात कामाची पाहणी करणार असेल तर वार्ड ७ पासून सुरूवात करावी

सौ.प्राजक्ता राजपूत :मीलकॉर्नर ते औरंगपूरा रस्त्याचे पॅचवर्क होत नाही.केंव्हा काम सुरू होणार आहे.

श्री.संजय केनेकर :विकास कामे होत नाही स.सदस्यांच्या तक्रारी आहेत. शासनाचे ४ अधिकारी आलेले आहे त्यांना काय काम दिले,वसुली होत नाही.पॅचवर्क कामे होत नाही प्रशासनाचे नियोजन शुन्य. समांतर लाईनचे काम कोणत्या पध्दतीने

होत आहे, लाईट चे टेंडर झाले. कोणते काम कुणाकडे दिले माहिती दिली जात नाही अनेक लाईट बंद आहे एक महिना शिल्लक आहे या कालावधीत तरी कामे करावी. कोणत्याच विभागाचे काम नियोजनबध्द चालू नाही. अधिकारी यांना अधिकार दिले जात नाही.

कार्य.अभियंता(अ-ड) :मिलकॉर्नर ते औरंगपूरा रस्त्याचे काम दिलेले आहे आठ दिवसात काम सुरू होईल पॅचवर्कचे वार्ड अ ड मध्ये काम चालू आहे.ठेकेदारा समवेत बैठक घेतली आठ दिवसात सर्व कामे सुरू होणार आहे.

श्री.मनीष दहिहंडे :नारेगांव येथे अनधिकृत प्लॉटींग चालू आहे यास कोण जबाबदार आहे. (सभागृहात छायाप्रत दाखवितात.)

मा.महापौर :प्रत्येक भागातील सिमेंट कॉक्रीट, डांबरीकरणाची अर्धवट राहिलेली कामाची मा.आयुक्तांनी माहिती घेवून ती कामे तातडीने सुरू करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :नवीन रस्त्याची कामे न घेता पुर्वी हाती घेतलेल्या रस्त्याची रस्त्याचे अर्धवट कामे पुर्ण करावी.

श्री.राजू शिंदे :एमआयडीसी चिकलठाणा भागातील डिफर पेमेंन्टची कामे ४ वर्षापासून चालू आहे पुर्ण केली नाही.

श्री.सुशिल खेडकर :मागील अर्धवट रस्त्याची कामे पुर्ण करावी नवीन रस्त्याची कामे हाती घेवू नये. ऐनवेळी ३० कोटीचा कामाचा प्रस्ताव घेणार आहे का तसा प्रस्ताव आलेला आहे का असेल तर आम्हाला ते मान्य नाही. अर्धवट रस्त्याची कामे पुर्ण करावी. त्यानंतर नवीन कामे घ्यावी.

शहर अभियंता :तसा प्रस्ताव आणणार नाही.

श्री.मनिष दहिहंडे :नारेगाव येथील जागेवर अतिक्रमण होत आहे. यास कोण जबाबदार आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :ज्या कामाची वर्कऑर्डर झाली टेंडर मध्ये आहे व जी अर्धवट कामे आहे ती सुरू होणार की नाही.

या वेळी श्री.मनिष दहिहंडे हे डायस समोर खाली बसतात.

श्री.हुशारसिंग चव्हाण :स.श्री.दहिहंडे यांचे वार्डात १०० एकर जागेवर अतिक्रमण चालू आहे.कोण जबाबदार आहे खुलासा करण्यात यावा.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

प्रशासकीय अधिकारी :चिकलठाणा येथील अतिक्रमण काढण्या बाबत सर्वांत जास्त कार्यवाया केल्या आहेत गेल्या २० वर्षापासून महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होते ८-१० खोल्या तोडल्या आहे.

श्री.मनिष दहिहंडे :दिशाभूल करीत आहे नारेगांव येथील अतिक्रमण काढलेले नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :पाण्याची व्यवस्था कोलमंडली आहे. उन्हाळा लागला पाणी मिळत नाही पाणीपुरवठयाची एकही काम होत नाही.

मा.महापौर :स.सदस्य श्री.मनिष दहिहंडे यांनी नारेगाव येथील अतिक्रमणाचा मुद्दा मांडला त्या संबधीत आजच्या आज कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा.

श्री.अफसर खान :विदयापीठ गेटच्या रस्त्यावर अतिक्रमण हे वाजवी पेक्षा ४-५ फुट पर्यत जास्तीचे बांधकाम असलेले तोडले.त्या नागरीकाचे नुकसान केले.

मा.महापौर :स.सदस्य श्री.अफसर खान यांचे सोबत संबधीत अधिकारी यांनी जायमोक्यावर जावे व योग्य कार्यवाही करावी.

श्रीमती छाया वेताळ :माझ्या वार्डातील डांबरीकरणाचे काम केले नाही.

मा.महापौर :टेंडर झालेली, वर्कऑर्डर केलेली कामे तातडीने सुरू करण्याचे आदेशीत केले आहे.

श्री.सुशिल खेडकर :जे ठेकेदार काम सुरू करणार नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.

श्री.किशोर नागरे :स.श्रीमती वेताळ यांचे वार्डातील ठेकेदार सहा महिण्यापासून काम सुरू करीत नाही.

मा.महापौर :ज्या ठेकेदारांना कामे दिली आहे ज्या कामाचे वर्कऑर्डर ,टेंडर झाले अशी कामे सुरू करण्यास काय अडचण आहे त्या संबधी ठेकेदारा यांना महापौर दालनात बोलवून मा.आयुक्त,शहर अभियंता यांनी ही उपस्थित रहावे.प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

श्रीमती साधणा सुरडकर:वसुली होत नाही ठेकेदारांना बीले दिली जात नाही त्यामूळे कामे होत नाही

श्रीमती सविता घडमोडे:माझ्या वार्डात पाणी आले नाही वार्डातील नागरीकांनी पाण्यासाठी माझ्या घरी मोर्चा आणला मला घेराव घातला.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी वार्डात जाऊन पाण्याचा प्रश्न सोडवावा.

सौ.साधणा सुरडकर :माझ्या वार्डातील नागरीक १००% कर,बेंटरमेंन्ट चार्जेस भरणा करतात तरी वेळेवर व पुरेसे पाणी मिळत नाही.विकास कामे होत नाही. अशा भागात प्राधान्याने कामे व्हावी.तसेच कालपरवाच युटीलीटीचे लोकांनी पाहून गेले. त्या भागात पाणी येत नाही तेथे एका ठिकाणी १००-१५० फुट पाण्याची लाइन टाकणे आवश्यक आहे.ताबडतोब काम करावे.

श्रीमती सविता घडमोडे :माझ्या वार्डातील पाण्याची समस्या पाच वर्षात सुटलेली नाही.नियमीत प्रश्न मांडते.पाणी वेळेवर येत नाही काही ठिकाणी २-२ दिवस पाणी रस्त्यावर वाहते.पिण्याचे पाणी येत नसल्याने महिला नागरीक माझ्या घरी मोर्चा घेवून आल्या माझ्या वार्डात पाण्याची व्यवस्था करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :पुर्ण शहराचा प्रश्न आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :पाण्याचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत आहे.पंपीग स्टेशन पासून किती पाणी शहरापर्यंत येते टाक्या भरल्या जात नाही.यास कोण जबाबदार आहे.

कार्य.अभियंता(पापू) :दिं.१६,१७,१८,१९ पासून जवळपास ४-५ दिवस जुना फारोळा येथे पंप बंद होते काल पासून टाक्याची लेव्हल येत आहे काल पासून पाणी येण्यास सुधारणा झाली.

श्री.गिरजाराम हाळनोर :जयविश्वभारती कॉलनी येथील टाकी भरलेली नाही पाणी कोठे जाते कळत नाही. यावर लक्ष ठेवणे मनपाच्या अधिका-यांचे काम आहे.

श्री.समीर राजूरकर :कोणत्याच विषयावर निर्णय होत नाही. नागरीक घरी मोर्चे घेवून येतात प्रशासन दखल घेत नाही पाण्याचा प्रश्न सुटणार नसेल तर योग्य नाही.

श्री.महेश माळवतकर :हर्सुल तलावातून किती वार्डात पाणी येते.

मा.महापौर :पाणी प्रश्ना विषयी कमेटी तयार केली त्यात जे विषय आताच मांडले ते घेतले जातील. कमेटीमध्ये पाच स.पदाधिकारी मा.आयुक्त शहर अभियंता तसेच पक्षाचे गटनेते हे सदस्य आहेत.

श्री.प्रमोद राठोड :दोन दिवस समांतर संदर्भात बैठक घेवून निर्णय घेतला पुढे काय कार्यवाही केली.माझ्या वार्डात लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक तयार होते. विचारणा केली असता समांतर एजन्सी लाईन टाकणार असे उत्तरे मिळतात.पाण्या संदर्भातील विकास कामे करणार की नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.महेश माळवतकर :हर्सुल धरणातून १० वार्डासाठी पाणी पुरवठा होतो किती पाणी शिल्लक आहे.पाणी संपले नतर या १० वार्डासाठी कोठून पाणी देणार श्री.कोल्हे साहेबांना उत्तर द्यावयास सांगावे.

श्री.रेणुकादास वैद्य :बाबाहरीदास नगर, संत एकनाथ रंग मदींरचा मागचा भागात १० दिवसापासून पाणी नाही.समांतरचे अधिकारी यांना फोन केला संबधीत सर्वांना फोन केले उचलत नाही. कर्मचा-यामध्ये समन्वय नाही तसेच एका ठिकाणी लाईन लिकेज आहे फोन करून सांगितले कुणी आले नाही हे प्रश्न कोण सोडवणार आहे.

श्रीमती सविता सुरे :वार्डात ६ वा. पाणी सोडण्याची वेळ असतांना रात्री १०,१२ वाजता पाणी येते.हे नियमीत होते.

कार्य.अभियंता(पापू) :स.सदस्या यांचे सोबत या विषयी चर्चा झाली होती पंपीग स्टेशन वर तांत्रिक अडचण आलेली होती पाणी वेळेवर मिळाले नसेल परंतु यापुढे नियमीत व वेळेवर पाणी येईल तशी सबंधीतांना ताकीद दिली आहे. स.स.श्री.वैद्य रेणुकादास यांचे वार्डात दोन गल्ल्याचा प्रश्न आहे मुख्य टाकीची लेव्हल आली की हा प्रश्न सुटेल.हर्सुल येथील पाणी पंपीग करून करून शहागंज येथील टाकीत टाकण्यात येते.

सौ.सावित्री वाणी :माझ्या वार्डात १५ दिवसापासून पाणी नाही. विहिरीवरून येणारे पाणी बंद झाले.टँकरने पाणी देण्यात यावे.

कार्य.अभियंता(पापू) :या भागात काल पासून पाणी देण्यास सुरू केले आजही पाणी दिले.

**विषय क्रमांक ७०८:-**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली शासन नगर विकास विभाग यांच्याकडील अधिसूचना क्रमांक टी.पी.एस.३०८८/४५४/सी.आर-५९/नवि-१२ दि. १४ ऑक्टोंबर, १९९१ नुसार मंजुर झालेली आहे. सदर नियमावलीस सुमारे २५ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. त्यामुळे त्यामध्ये अनेक ठिकाणी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. दरम्यानच्या काळात सिडको भाग महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेला आहे. तसेच आता महानगरपालिकेचा दर्जा वर्ग “ड” मधुन वर्ग “क” मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.या बाबीचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजुर केलेले व अस्तित्वात असलेले विकास नियंत्रण नियम जसेच्या तसे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये लागू करणे हे शहराच्या दृष्टिकोनातून व शहराचा पध्दतशीर विकास होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियम आहे त्या परिस्थितीत औरंगाबाद शहरामध्ये लावण्यासाठी मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या प्रस्तावास महानगरपालिकेने मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ प्रमाणे शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी शहरासाठी करण्यात येईल. करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

संवाद:-

श्री.काशिनाथ कोकाटे :पिंपरी चिंचवड महापालिकेची नियमावली दिली यावर अभ्यास करावा लागेल.या नियमावलीत व औरंगाबाद महापालिकेच्या नियमावलीत मध्ये काय फेरबदल व फरक आहे हे तपासणे आवश्यक आहे.जशीच्या तशी नियमावलीचा वापर करणे हे चुकीचे ठरवू शकते.यासाठी वेळ लागणार आहे यावर अभ्यास करून निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :प्रशासन नियमानुसार कार्यवाही करेल मंजूर करून शासनाकडे पाठवावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :यास विरोध नाही. सांगोपांग चर्चा झाली पाहिजे.त्यानंतर कार्यवाही करावी.

श्री.फिरदोस फातेमा :पिंपरी चिचंवड महापालिकेचे नियमावली दिली. यावर अभ्यास करण्यासाठी वेळ दिला पाहिजे.पिंपरी चिचंवड व या महापालिकेची भौगोलिक परीस्थितीत मोठा फरक आहे. आपतकालीन परिस्थितीमध्ये या महापालिकेच्या हद्दीत अग्निशमन विभाग १२ मीटरपर्यंत असलेल्या इमारतीमध्ये काम करू शकते.त्याचा विचार व्हावा ११-१२ मजल्यापर्यंत अग्निशमन विभाग काम करू शकत नाही यात नियमावलीत चेजेंस व्हावे. महापालिकेने आपल्या पध्दतीने नियम तयार करावे त्यासाठी वेळ दयावा.

श्री.सुशिल खेडकर :ब-याच प्रभागामध्ये अतिक्रमणचा प्रश्न निर्माण झाला. जुना डीसीआर हा ठराव योग्य आहे. पिपंरी चिंचवड महापालिकेने शासनाकडे नियमावली तयार करून पाठवली त्यास मंजूरी आहे. हा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवावा. ज्या त्रुटी शासनाकडून येइल त्यानुसार अमलबजावणी करण्यास हरकत नसावी यास मान्यता दयावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :हे मंजूर करणे आवश्यक असेल तरीही या महापालिकेचे डीसीआर व पिंपरी चिंचवड महापालिकेचे डीसीआर मध्ये काय फरक,वेगळे आहे खुलासा घ्यावा नंतर यास मंजूरी दयावी.

श्री.समीर राजूरकर :ठराव मंजूर होऊन शासनाकडे जाईल शासन ५०-६० दिवस डीसीपी रूलला मान्यता देते वेळी त्यावर अक्षेप नोंदविण्यासाठी कालावधी देणार आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :हा प्रस्ताव आला प्रशासनाचे अभिनंदन करतो.३ वर्षापुर्वी विषय आलेला होता मंजूरी दिली नाही. विषय मंजूर केला तरी राज्य शासनाला अधिकार आहे.हे मंजूर केल्यानंतर कमीत कमी २ लक्ष नागरीकाचा फायदा होणार अनेक वार्डात बेगमपुरा असेल इतर भागात एक इंच जागा शिल्लक नाही.अशी नियमावली लागू केल्यास व ठरावाची अमलबजावणी केल्यास शुल्क वाढणार व महसूली उत्पन्नात वाढ होणार शहराच्या हिताचा हा विषय प्रलंबीत होता मंजूर करून शहरातील नागरीकांना दिलासा मिळावा.

श्री.प्रशांत देसरडा :जनतेसाठी महत्वाचा विषय मंजुरी दिली तर सामान्य माणसांना फायदा होईल.परवानगी घेतात परंतु भोगवटा घेतांना साईड मार्जीन असेल इमारतीचा उंचीचा विषय असेल याचा फायदा नागरीकांना मिळत नाही.अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार किती लोकांना फायदा होत होता याचा विचार व्हावा.नगररचना विभागामध्ये अनेक संचिका आजही प्रलंबीत आहेत.ही नियमावली मंजूर झाली तर जनतेला फायदा झाला पाहिजे. तातडीने परवानगी मिळाली पाहिजे असा दृष्टीकोन समोर असावा. डीपी रोड करतांना ज्या जागा भुसंपादित कराव्या लागतात त्या मिळकत धारकांना एफएसआय किंवा टीडीआर यापैकी एक दिले जाते. अशा वेळी आर्थीक परीस्थिती बघता अशा मिळकत धारकांना टीडीआर घेण्या बाबत कम्पलसरी करावे.

मा.महापौर :या प्रस्तावा विषयी माहिती दयावी.

सहा.संचालक(न.र.) :औरंगाबाद महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण नियमावली १९९१ ला मंजुर झालेली आहे. त्यास वेळोवेळी बरेच दुरूस्त्या प्रस्तावित केल्या. आज त्याची अंमलबजावणी करता येत नाही. महाराष्ट्रातील पिंप्री-चिंचवड महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली जशीच्या तशी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी लागू करण्यास मंजुरी देऊन ठराव पारित करून शासनाकडे पाठविल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ च्या कार्यवाही अंतर्गत शासन विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करून ६० दिवसांची मुदत देऊन जाहिर प्रगटनाने सुचना व हरकती मागवून व त्यावर सुनावणी देऊन विशेष अधिकारी प्रस्ताव शासनाकडे सादर करतील व त्यास शासनाची मंजुरी मिळाल्यास अंमलबजावणी होईल.

श्री.प्रमोद राठोड :सिडको हडको भागात ही टीडीआर लावता येईल का हे यात पहावे.

सहा.संचालक(न.र) :एमआरटीपी ॲक्टचे कलम १२६ नुसार तीन पर्याय आहेत. एफएसआय टीडीआर किंवा पैशाच्या स्वरूपात मोबदला देवू शकतो. यात बांधकाम नियमावलीमध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न करावे लागेल.

श्री.प्रफुल्ल मालाणी :ही नियमावली लागू झाल्यास सिडको हडको भागातील ही नियमावली लागू होईल का? यासाठी पुन्हा सिडको प्राधीकरणाची मान्यता घ्यावी लागेल.

श्री.विजय वाघचौरे :टीडीआर गावठाण भागासाठी लागू होईल.

सहा.संचालक(न.र) :टीडीआर गावठाण मध्ये लागू नाही.

श्री.किशोर नागरे :प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर :- विषय मंजुर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन अधिसूचना क्रमांक टी.पी.एस.३०८८/४५४/सी.आर-५९/नवि-१२ दि. १४ ऑक्टोंबर १९९१ नुसार मंजुर झालेली इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीस सुमारे २५ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. त्यामुळे त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने व दरम्यानच्या काळात सिडको भाग देखिल महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेला आहे. या बाबीचा विचार करता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी मंजुर केलेले

व आज स्थितीत अस्तित्वात असलेले इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली जसेच्या तसे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये लागू करणेस मंजुरी देण्यात येते व त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ प्रमाणे प्रस्तावीत फेर बदला संबंधी आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०९ :-**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीसाठी हस्तांतरणीय विकास हक्काची तरतूद दिनांक १६/०५/२००७ चे शासन निर्णयानूसार लागू झालेला आहे. मात्र सदर योजनेस अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच महानगरपालिकेची आर्थीक परिस्थीती फारशी समाधानकारक नसल्याने तसेच हस्तांतरणीय विकास हक्क तरतुदी सहीत अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने विकास योजना अंमलबाजणीस मर्यादा पडत आहे. त्यामुळे हस्तांतरणीय विकास हक्क नियमावलीत काही बदल करणे आवश्यक वाटते. त्याकरीता यापूर्वी मा. सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र. ९२ दि. १८/०९/२०१० मध्ये ठराव ठेवण्यात आला होता. त्यास मान्यता मिळाली नाही. तसेच टि.डी.आर. वापरात बदल झाल्यास त्यास नागरीकांकडून प्रतिसाद मिळेल. त्याकरीता टि.डी.आर. वापरामध्ये बदल होणे आवश्यक वाटते. त्यास्तव पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

०१. सदर नियमावलीमध्ये झोन अे मधील तयार झालेला टि.डी.आर. हा झोन **अे** मध्ये वापरण्यास प्रतिबंधीत आहे. करीता झोन **अे** हा गावठाण, दाटीवाटीचा विकसीत झालेला भाग व त्या व्यतिरीक्त असलेला भाग हे **अे-१** झोन असा बदल करुन त्या क्षेत्रामध्ये मंजुर रेखांकनातील ९.०० मीटर रुंद रस्त्यावरील भूखंडावर झोन **अे** मधुन उपलब्ध होणारा टि.डी.आर. वापरण्यास अनुज्ञेय करणे.

०२. शहरातील खालील रस्त्यालगत टि.डी.आर. वापरण्यास सध्याच्या नियमावतील प्रतिबंध आहे.

१. जालनारोड
२. जळगावरोड
३. मुंबई रोड
४. जालनारोड (सेव्हनहिल जंक्शन) ते गारखेडा सुतगिरणी रस्ता.
५. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रोड
६. जालनारोड (हॉटेल अमरप्रित जंक्शन) ते रेल्वे लेव्हल कॉसींग
(शहानुरमिया दर्गा मार्ग) रस्ता

वरील नमुद रस्त्यांपैकी राष्ट्रीय महामार्ग व राज्य रस्ता वगळून इतर तीन रस्त्याची क्षमता बघता त्यावरील टि.डी.आर. वापरण्याचे प्रतिबंध काढुन घेतल्यास टि.डी.आर. वापरण्यास बांधकाम व्यवसाईक व जमीन मालक उद्युक्त होऊ शकतात.

०३. सध्याच्या मंजुर नियमावलीनूसार भूखंड क्षेत्राचे ०.४ एवढा टि.डी.आर. व भूखंडाचे क्षेत्र रस्त्याने बाधीत होत असल्यास त्यासाठी अतिरीक्त चटई क्षेत्र ०.४ असे एंकदर १.८ पर्यंत चटई क्षेत्र देय होते. मात्र एकाच रस्त्यावरील काही भूखंड रस्त्याने बाधीत होतात तर काही बाधीत होत नाही. त्यामुळे अशा दोन प्रकारात अनुज्ञेय चटई क्षेत्र वेगवेगळे होते. त्यामुळे अशी फोड न करता सरसकट १.८ एवढया चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंत (म्हणजेच वाढीव ०.८ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक) अनुज्ञेय केल्यास वाढीव टि.डी.आर. वापरला जाईल व टि.डी.आर घेण्याकडे नागरीकाचा कल वाढेल.

वरील तीनही बदल आजही टि.डी.आर. चा वापर वाढण्यासाठी आवश्यक वाटतात. या शिवायही काही बदल करणे योग्य वाटते. जेणे करुन टि.डी.आर. घेणे व वापरणे याकडे नागरीकांचा

कल वाढेल व महानगरपालिकेस विकास योजनेची अंमलबजावणी करणे सुकर होईल. त्यात प्रामुख्याने

०१. टि.डी.आर. वापरणाऱ्या इमारतीसाठी टि.डी.आर. वापरण्यामुळे वाढणाऱ्या उंचीसाठी अतिरीक्त सामासिक अंतराची सक्ती न करता मुळ चटई क्षेत्राचा वापर करतांनाचे उंची नूसार आवश्यक सामासिक अंतरानूसारच बांधकाम परवानगी अनुज्ञेय करणे.

०२. टि.डी.आर. वापरण्याऱ्या इमारतीसाठी जर त्या इमारतीत संपूर्ण मजला पार्किंग म्हणुन वापरला जात असल्यास इमारतीची उंची मोजतांना पार्किंगच्या मजल्याची उंची त्यामधून वगळणे.

वरील प्रमाणे बदल करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. त्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

संवाद :-

श्री.समीर राजूरकर :अभिनंदन! यात काही त्रुट्या ठेवू नका. ए-झोन मध्ये जवळपास रोषणगेट, सतीश पेट्रोल पंप येथे रोड वाईडींग केले तेथील लोकांना टीडीआर वापरता आला नाही.१ व २ मध्ये कोणते नावे येणार आहे यामध्ये ले-आऊट असलेले झोनमधून घेणार आहे का?

श्री.गजानन बारवाल :प्रशासनाने भुमिका स्पष्ट करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अे आणि अे-१ असे दोन झोन लागू केले उर्वरीत झोनला कोणता टीडीआर लागू होणार आहे. जुने भुसंपादित केलेले जागा त्यांना मोबदला दिला नाही. टीडीआर नियमावली लागू झाल्यानंतरच्या प्रकरणात टीडीआर देवू शकतो. जुने मिळकत धारक उदा. अमरप्रित ते शहानुरवाडी दर्गा पर्यंत भाग आहे टिळकनगरचा भाग येतो असे अनेक भाग आहे पाण्याचा टाकीचा विषय आहे भांजीमंडईचा विषय आहे अशा लोकांना पैसे देवू शकलो नाही त्यांना टिडीआर देवू शकतो का? दुरूस्ती करणे आवश्यक असेल तर या ठरावात करावी.

मा.उपमहापौर :केंद्र शासनाने नुकताच नवीन तत्सम कायदा मंजूर केला जर भुसंपादन केले तर शहरी भागात दुप्पट व ग्रामीण भागात चौपटीने पैसे दयावे. त्याप्रमाणे टीडीआर दुप्पट देणार की सिंगल देणार आहे.

सहा.संचालक(न.र) :औरंगाबाद शहरासाठी २००७ मध्ये टीडीआर मंजूर केलेला आहे.टीडीआरचे ABCDE असे पाच झोन आहे. अे झोन मध्ये विकसीत होणारा भाग DCE मध्ये मंजूर करता येत नाही.अे मधील भाग बीसीडीई मधला मंजूर करता येतो बी मध्ये विकासीत होणारा भाग हा बीसीडीई मध्ये मंजूर करता येतो.सी मध्ये विकसीत होणारा भाग हा सीडीई मध्ये मंजूर करता येतो.अे झोन मध्ये टीडीआरच्या झोन मध्ये जे गावठाण सोडुन तो ए-१ झोन म्हणून दर्शविलेले आहे. ज्याला ले-आऊटच्या मध्ये टीडीआर त्याला आर-२ म्हणतो त्यास मंजूरी देण्यात यावी असा हा प्रस्ताव आहे.प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात येईल.टीडीआर नियमावली महापालिकेची मंजूर

झालेला आहे.ज्यावेळी भुसंपादन करायचे आहे त्यावेळ पासून पुढील टीडीआर देवू शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य :जुन्या भागात अनेक नागरीकांच्या प्रॉपटीज घेतल्या २०-२० वर्षे झाले. त्यांना कोणताही मोबदला दिला नाही भुसंपादन केले नाही. आज मोबदला देता येईल का?

सहा.संचालक (न.र) :शासानाकडे प्रस्ताव पाठवितांना याचा अंतर्भुत करण्याचा प्रयत्न केला जाईल.आताच मा.उपमहापौर यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा असा की केंद्र शासनाने २०१३ मध्ये भुसंपादाना विषयी एक कायदा तयार केला त्यामध्ये शहरी भागातील भुसंपादन करावयाचे असेल तर रेडीरेकनरच्या अडीच पट व ग्रामीण भागासाठी चार पट मोबदला देण्याचे नमूद आहे.आता सद्या टीडीआर सिंगलच देत आहे. महाराष्ट्र शासनाने जो भुसंपादनाचा कायदा आहे त्याप्रमाणे कार्यवाही सुरू केल्याचे समजते.

श्री.काशिनाथ कोकाटे :कुठे ही टीडीआर देणार आहे का ?

सहा.संचालक(न.र) :स्टेट व नॅशनल हॉयवेवर टीडीआर देवू शकत नाही दुप्पट, अडिच पट शासन दरबारी चालू आहे.

श्री.प्रफुल्ल मालाणी :सन २०१३ ला जो मोबदला देण्याचा केद्र शासनाने कायदा केला त्याप्रमाणे यापुर्वीच्या मिळकत धारकास टीडीआर किंवा मोबदला या कायदयाप्रमाणे मिळेल की पुर्वीच्या कायदयाप्रमाणे मिळेल.ज्यांना काहीच मोबदला आतापर्यंत दिलेला नाही त्यांना या कायदयाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.प्रशांत देसरडा :सिडको साठी टीडीआर लागू करावा.

श्री.किशोर नागरे :मंजूरी दयावी.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीसाठी हस्तांतरणीय विकास हक्काची तरतूद दिनांक १६/०५/२००७ चे शासन निर्णयानूसार लागू झालेला आहे. विकास योजना प्रस्तावांची परिणामकारकरित्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास हक्क वापरात खालीलप्रमाणे बदल करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. सदर नियमावलीमध्ये झोन अे मधील तयार झालेला टि.डी.आर. हा झोन **अे** मध्ये वापरण्यास प्रतिबंधीत आहे. करीता झोन **अे** हा गावठाण, दाटीवाटीचा विकसीत झालेला भाग व त्या व्यतिरीक्त असलेला भाग हे **अे-१** झोन असा बदल करुन त्या क्षेत्रामध्ये मंजुर रेखांकनातील ९.०० मीटर रुंद रस्त्यावरील भूखंडावर झोन **अे** मधुन उपलब्ध होणारा टि.डी.आर. वापरण्यास अनुज्ञेय करणे.

०२. शहरातील खालील रस्त्यालगत टि.डी.आर. वापरण्यास सध्याच्या नियमावतील प्रतिबंध आहे.

१. जालनारोड
२. जळगावरोड
३. मुंबई रोड
४. जालनारोड (सेव्हनहिल जंक्शन) ते गारखेडा सुतगिरणी रस्ता.
५. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रोड
६. जालनारोड (हॉटेल अमरप्रित जंक्शन) ते रेल्वे लेव्हल कॉसींग (शहानुरमिया दर्गा मार्गे) रस्ता

वरील नमुद रस्त्यांपैकी राष्ट्रीय महामार्ग व राज्य रस्ता वगळून इतर तीन रस्त्याची क्षमता बघता त्यावरील टि.डी.आर. वापरण्याचे प्रतिबंध काढुन घेतल्यास टि.डी.आर. वापरण्यास बांधकाम व्यावसाईक व जमीन मालक उद्युक्त होऊ शकतात.

०३. सध्याच्या मंजुर नियमावलीनूसार भूखंड क्षेत्राचे ०.४ एवढा टि.डी.आर. व भूखंडाचे क्षेत्र रस्त्याने बाधीत होत असल्यास त्यासाठी अतिरीक्त चटई क्षेत्र ०.४ असे एंकदर १.८ पर्यंत चटई क्षेत्र देय होते. मात्र एकाच रस्त्यावरील काही भूखंड रस्त्याने बाधीत होतात तर काही बाधीत होत नाही. त्यामुळे अशा दोन प्रकारात अनुज्ञेय चटई क्षेत्र वेगवेगळे होते. त्यामुळे अशी फोड न करता सरसकट १.८ एवढया चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंत

(म्हणजेच वाढीव ०.८ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक) अनुज्ञेय केल्यास वाढीव टि.डी.आर. वापरला जाईल व टि.डी.आर घेण्याकडे नागरीकाचा कल वाढेल.

वरील तीनही बदल आजही टि.डी.आर. चा वापर वाढण्यासाठी आवश्यक वाटतात. या शिवायही काही बदल करणे योग्य वाटते. जेणे करुन टि.डी.आर. घेणे व वापरणे याकडे नागरीकांचा कल वाढेल व महानगरपालिकेस विकास योजनेची अंमलबजावणी करणे सुकर होईल. त्यात प्रामुख्याने

०१. टि.डी.आर. वापरणाऱ्या इमारतीसाठी टि.डी.आर. वापरण्यामुळे वाढणाऱ्या उंचीसाठी अतिरीक्त सामासिक अंतराची सक्ती न करता मुळ चटई क्षेत्राचा वापर करतांनाचे उंची नूसार आवश्यक सामासिक अंतरानूसारच बांधकाम परवानगी अनुज्ञेय करणे.

०२. टि.डी.आर. वापरण्याऱ्या इमारतीसाठी जर त्या इमारतीत संपूर्ण मजला पार्किंग म्हणुन वापरला जात असल्यास इमारतीची उंची मोजतांना पार्किंगच्या मजल्याची उंची त्यामधून वगळणे.

वरील प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बाबा पेट्रोल पंप महावीर चौकात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे उड्डाण पुल बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर महावीर चौकात असलेल्या वाहतूक बेटातील भगवान महावीर स्तंभ व कारंजे या उड्डाणपुलाच्या बांधकामात तुर्त अडथळा होत असल्याने सदरील भगवान महावीर स्तंभ व या वाहतूक बेटातील कारंजे हटवून उड्डाणपुलाचे बांधकाम पुर्ण झाल्यावर परत याच ठिकाणी सदरील भगवान महावीर स्तंभ व या वाहतूक बेट व त्यातील सौंदर्यीकरण (कारंजे,लॉन इ.) सुशोभिकरणासह पुन्हा स्वखर्चाने पुर्वीप्रमाणेच करुन देणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत उड्डाणपुल बांधत असलेल्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळतर्फे कार्यकारी अभियंता यांच्या संदर्भीय पत्र क्र.१२४/२०१४ दिनांक २७.११.२०१४ नुसार विभागाने सादर केला आहे. तसेच याबाबत संबंधीत विभागासोबत करारनामा करून घेणेच्या अटीवर या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेबाबत शिफारस करण्यात आली आहे.

करीता विषयांकीत प्रकरणी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- दुरूस्तीसह मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन कडून बसस्थानकाकडे बाबा पेट्रोल पंप महावीर चौकात जाणाऱ्या रस्त्यावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे उड्डाण पुल बांधकाम प्रगतीपथावर असून चौकाचे मध्यभागी भगवान महावीर स्तंभ जे १९७४-७५ ला भगवान महावीर यांच्या २५०० व्या जन्म महोत्सवी उभारण्यात आले होते व त्याची देखभाल दुरूस्ती महानगरपालिका व सकल जैन समाज करीत असे. उड्डाण पुलाच्या बांधकामात वाहतूक बेट व त्यातील सौंदर्यीकरण (कारंजे,लॉन इ.) अडथळा होत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे काम करण्यात येणार आहे. सदरील भगवान महावीर स्तंभाचे सौदर्यीकरण व , वाहतूक बेट आणि त्यातील सौंदर्यीकरण (कारंजे,लॉन इ.) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे पुन्हा तयार करुन देणार आहेत.स्तंभाच्या कामाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही व धार्मिक भावना दुखविल्या जाणार नाहीत याची संबंधीतांनी काळजी घेणे व आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. महावीर स्तंभ न हलविता मुळ स्थितीत ठेवून स्तंभास कोणत्याही प्रकारची बाधा न पोहचता स्तंभाच्या व उड्डाणपुलामध्ये किमान ५ फुट अंतर ठेवूनच हे काम करून घेण्यास व स्तंभाची शोभा कमी होणार नाही आणि उड्डाणपुलाची रहदारी स्तंभावरून जाऊ नये म्हणुन रस्ता दुभाजक टाकण्यात यावे. संबंधीत विभागासोबत करारनामा करून घेतांना सकल जैन समाजाच्या २ प्रतिनिधींचा समावेश करून घेण्याच्या अटीवर व २ एप्रिल महावीर जयंती नंतरच स्तंभ झाकूनच भगवान महावीर स्तंभाचे सौंदर्यीकरण पुर्वीप्रमाणेच करून देण्याच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७११:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.५५ कैसर कॉलनी भागातील न्यु कॉलनी येथे महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर बांधण्यात आलेल्या हॉलमध्ये वाचनालय (वाचनकक्ष) सुरू करणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेल्या आहे.

सदर ठिकाणी वाचनालय सुरू करणेसाठी लाकडी टेबल,प्लास्टीक खुर्च्या व लोखंडी रॅक इ.आवश्यक फर्निचरसाठी अंदाजे रक्कम रू.३५०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.तसेच वाचनालय सुरू झाल्यांनंतर आवश्यक ते कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत उपआयुक्त (म.) यांनी प्रस्तावित केले आहे.

तसेच वाचनालयासाठी लागणारी वर्तमान पत्रे, मासिके खरेदीवर अंदाजे रू.३०००/-पर्यंत मासिक खर्च अपेक्षित आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे कैसर कॉलनी वॉर्डातील न्यु कॉलनी येथील महानगरपालिका खुल्या जागेवर बांधण्यात आलेल्या हॉलमध्ये नविन वाचानालय (वाचनकक्ष) सुरू करणे व उपरोक्त अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव मा.सर्वसाधरण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५५ कैसर कॉलनी भागातील न्यु कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर बांधण्यात आलेल्या हॉलमध्ये वाचनालय सुरू करणेस तसेच त्यासाठी लाकडी टेबल,प्लास्टीक खुर्च्या व लोखंडी रॅक इ.आवश्यक फर्निचरसाठी अंदाजे रक्कम रू.३५०००/- पर्यंतच्या अपेक्षित खर्चास तसेच वाचनालयासाठी लागणारी वर्तमान पत्रे, मासिके इ. खरेदीवर लागणारा अपेक्षित मासिक खर्च र.रू.३०००/- यास आणि वाचनालय सुरू झाल्यांनंतर आवश्यक ते कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२५ सिडको N-७ येथील हॉटेल सनी ते ओंकार गॅस एजन्सी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे अंदाज पत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१३-१४ च्या दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अंदाज पत्रक रक्कम रु.१,१३,०७,३००/- चे होत आहे. सदरील रस्ता १५.०० मी. रुंदीचा असून या रस्त्यावर शाळा, मंदीर, हॉटेल्स, आणि धार्मीक स्थळे आहेत. त्यामुळे हा रस्ता वर्दळीचा आहे. तसेच हा रस्ता भौगोलीक दृष्ट्या उताराचा असल्यामुळे पावसाळयात या रस्त्यावरुन मोठया प्रमाणात पावसाचे पाणी वाहुन डांबरीकरण खराब होऊन रस्त्यावर खड्डे पडतात, त्यामुळे कायमस्वरुपी व दिर्घकालीन रस्त्याची सुविधा होणेस्तव या रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीचे कॉंक्रीटीकरण करण्याचे प्रस्तावीत आहे. या कामाचा खर्च शहर एकात्मीक रस्ते विकास योजना या लेखाशिर्ष अंतर्गत करण्याचा व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्यात येते.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,१३,०७,३००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वॉर्डातील काही कामे अर्धवट आहेत. ती पुर्ण करावी तसेच ज्या कामाच्या निवीदा वर्क ऑर्डर झालेल्या आहेत, तसेच जी कामे अर्धवट आहेत अशी कामे अगोदर करावी.

श्रीमती प्राजक्ता भाले :बजरंग चौक ते बळीराम पाटील हायस्कूल पर्यंतच्या रस्त्याचे काम थांबलेले ते काम चालु करण्यात यावे.

मा.महापौर :विषय मंजुर तसेच शहरातील ज्या कामाच्या निवीदा वर्क ऑर्डर झालेल्या आहेत, तसेच जी कामे अर्धवट आहेत अशी कामे करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५ सिडको N-७ येथील हॉटेल सनी ते ओंकार गॅस एजन्सी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटीकरण करणे या कामाचा खर्च शहर एकात्मीक रस्ते विकास योजना या लेखाशिर्ष अंतर्गत करण्याकरीता रक्कम रु.१,१३,०७,३००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१३ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, बीड बायपास रोड रेल्वेपटरी गेट ए-५६ येथील राहणा-या रहिवासीयांनी या परिसरातील जिजामातानगर येथील चौकास व रस्त्यास हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मार्ग व चौक असे नांव देणेसाठी मागणी केली आहे.सोबत जनहित नागरी विकास कृती समिती मुकुंदनगर रेल्वे गेट नं.५६ नविन मुकुंदवाडी चे निवेदन जोडण्यात आले आहे.

करीता जिजामातानगर येथील चौकास व रस्त्यास हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मार्ग व चौक असे नाव देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधरण सभेच्या मंजुरीस्तव सादर

**सुचक :-** श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे,श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**अनुमोदक :-** श्री. किशोर बाबुराव नागरे, श्री.गजानन रामकिसन बारवाल

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड बायपास रोड रेल्वेपटरी गेट ए-५६, जिजामातानगर येथील चौकास व रस्त्यास हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मार्ग व चौक असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर ते जयभवानी रोड या मुख्य रस्त्यावरील विविध चौकांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यांत यावे अशी या भागातील नागरीकांची मागणी आहे.

१.सद्‌भावना गणपती मंदिरा समोरील चौकास राजमाता जिजाऊ चौक असे नाव देणे.
२.एन-४ येथील युनियन बॅके समोरील चौकास संत सेवालाल महाराज चौक असे नाव देणे.
३.गोकूळ स्वीट समोरील चौकास संत शिरोमणी गूरू रोहीदास महाराज चौक असे नाव देणे.
वरीलप्रमाणे चौकाचे नामकरण करणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधरण सभेच्या मंजुरीस्तव सादर

**सुचक :-** श्री. सूर्यकांत सुभानराव जायभाये,श्री. समिर सुभाष राजूरकर
**अनुमोदक :-**श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे,श्री. किशोर बाबुराव नागरे,श्री. विरभद्र रामलिंग गादगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर ते जयभवानी रोड या मुख्य रस्त्यावरील विविध चौकांचे १.सद्‌भावना गणपती मंदिरा समोरील चौकास राजमाता जिजाऊ चौक २. एन-४ येथील युनियन बॅके समोरील चौकास संत सेवालाल महाराज चौक ३. गोकूळ स्वीट समोरील चौकास संत शिरोमणी गूरू रोहीदास महाराज चौक असे नामकरण करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१५ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलीकनगर येथील जी.बी.आर-ई-११ अ.क्र.१० विविध टिकाणी कॉक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रू.१० लक्ष तरतुद आहे.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र. ८३ पुंडलीकनगर येथील जी.बी. आर-ई-११ अ.क्र.१० विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रु.१० लक्ष तरतुद आहे. | वॉर्ड क्र.८३ पुंडलीकनगर येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.५ लक्ष<br>वॉर्ड क्र. २६ गणेशनगर येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.५ लक्ष<br>वॉर्ड क्र.४७ अविष्कार कॉलनी येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.२.५ लक्ष |

करिता मान्यतेस्तव सादर

**सुचक :-** श्री. सुर्यकांत सुभानराव जायभाये **अनुमोदक :-** श्री. किशोर बाबुराव नागरे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ पुंडलीकनगर येथील जी.बी.आर-ई-११ अ.क्र.१० विविध टिकाणी कॉक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रू.१० लक्ष तरतुद वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र. ८३ पुंडलीकनगर येथील जी.बी. आर-ई-११ अ.क्र.१० विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रु.१० लक्ष तरतुद आहे. | वॉर्ड क्र.८३ पुंडलीकनगर येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.५ लक्ष<br>वॉर्ड क्र. २६ गणेशनगर येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.५ लक्ष<br>वॉर्ड क्र.४७ अविष्कार कॉलनी येथे कचरा संकलनासाठी डस्ट बिन वाटप करण्यासाठी रक्कम रु.२.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्व समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी पुण्याचे काम केले आहे. गोरगरीबांसाठी विहीरी,बारव,तळे व धर्मशाळा बांधल्या तसेच महिलांची सती प्रथा बंद केली अनेक जनहितीची कामे केलेल्या या महान स्त्री ची कार्य अनमोल असल्याने त्यांचे वारंवार स्मरण व्हावे करीता चिकलठाणा येथील नवीन शासकीय रुग्णालयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर तसेच मंजुरीनंतर शासनास कळविणे बाबत मान्यतेस्तव.

**सुचक :-** श्री.संजय सांडु चौधरी, श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.बबन पंडीतराव नरवडे

**अनुमोदक :-** श्री. संजय रामदास जोशी, श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे, श्री.सुरेंद्र मानिकराव कुलकर्णी, श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे, श्री.रावसाहेब धोंडीराम गायकवाड.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील नवीन शासकीय रुग्णालयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यास मंजुरी देऊन शासनास कळविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येते. तथापि या जयंतीच्या निमित्ताने योग्य ते सांस्कृतिक कार्यक्रम,व्याख्याने,नाटके अशा प्रकारचे कोणतेही कार्यक्रम करण्यात येत नाही.संपुर्ण जगाचे आदर्श असणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व जनमाणसात व युवावर्गात रुजावे या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने शिवरायांच्या इतिहासावरील परिवर्तनवादी नाटके,व्याख्याने,सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम (रक्तदान शिबीर,मोफत आरोग्य तपासणी,स्त्री भ्रुणहत्या, नेत्रदान व देहदान) या संबंधीत जनजागृती अभियान राबवावे तसेच महानगरपालिकेच्या शाळेत विविध कार्यक्रम देखिल घेण्यात यावेत. या

कामासाठी साधारणत: ०७.०० लक्ष रुपये आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.संजय सांडु चौधरी, श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे

**अनुमोदक :-** श्री. संजय रामदास जोशी, श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे, श्रीमती साधना गणेश सुरडकर, श्री.अनिल श्रीकिसन मकरिये, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे, श्री.रावसाहेब धोंडीराम गायकवाड,श्री.बबन पंडीतराव नरवडे.

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या वतीने शिवरायांच्या इतिहासावरील परिवर्तनवादी नाटके,व्याख्याने,सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम (रक्तदान शिबीर,मोफत आरोग्य तपासणी,स्त्री भ्रुणहत्या, नेत्रदान व देहदान) या संबंधीत जनजागृती अभियान राबविणे तसेच महानगरपालिकेच्या शाळेत विविध कार्यक्रम घेऊन या कामासाठी साधारणत: ०७.०० लक्ष रुपये आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये स्थापित झालेली स्वायत्त संस्था असून महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास खात्याच्या अखत्यारित त्याचे कामकाज चालते.

अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ व नियम १९५५ ची अंमलबजावणी औरंगाबाद महापालिका क्षेत्राकरीता औरंगाबाद मनपा मार्फत सन १९८३ पासून चालु होती. तथापि सन २०११ मध्ये अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन लागु झाल्यापासून महानगरपालिका क्षेत्रातील अन्न आस्थापनांना परवाना देणे व तपासणी करण्याचे अधिकार जे पुर्वी औरंगाबाद मनपातील अन्न निरीक्षकांना होते ते आता शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने परस्पर आपल्याकडे घेतले आहेत. त्या बाबतील महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे कोणतेही आदेश अद्याप महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाहीत. केवळ कायदा लागु झाल्यानंतर मा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक १६.०९.२०११ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सदर कायद्यातील अन्न परवाना देण्याबाबतच्या तरतुदी तसेच त्यांच्याशी संबंधीत अधिकाऱ्यांचे बदललेल्या संविधानिक पदांबद्दल माहिती नमुद केली आहे. सदर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या भुमिकेबाबत काहीही नमुद केलेले नाही. तशी आवश्यकताही नाही. कारण अन्न सुरक्षा व मानदे कायदा हेतु क्र. ४ मध्ये सदर कायद्याची अंमलबजावणी राज्य शासन व संबंधीत महानगरपालिकांनी करावयाची आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच कायद्यातील कलम ९७ मध्ये अगोदर अस्तित्वात असलेली अंमलबजावणी यंत्रणा अबाधित ठेऊन त्यांचेकडून कायद्याची अंमलबजावणी करावयाची आहे. असे नमुद केले आहे. अन्न सुरक्षा व मानदे कायद्यानुसार स्थापित झालेल्या केंद्रीय सल्लागार समितीने सुध्दा कायद्याची अंमलबजावणी राज्य शासन व महानगरपालिका यांनी करावयाची आहे. असे आजपर्यंत झालेल्या प्रत्येक मिटींगमध्ये नमुद केले आहे.

परंतु अन्न व औषध प्रशासन विभागाने मनपा क्षेत्रामध्येही सदर कायद्याची अंमलबजावणी परस्पर सुरू केल्याने परवाना फीच्या स्वरुपात महानगरपालिकेस मिळणारा कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडत आहे. तसेच घटनेतील कलम २४३ डब्ल्यु १२ वी सुची मध्ये सार्वजनिक आरोग्याबाबत

महानगरपालिकेस असणाऱ्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक सबलीकरण करण्यासाठी करण्यात आलेल्या घटना दुरूस्तीच्या मुख्य उद्देशास बगल दिली जात आहे.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता आरोग्यप्रमुख जे कायद्याने वैधानिक पद आहे. व अन्न सुरक्षा कायद्यानुसार त्यांना किंवा अर्हताधारक केलेल्या अधिकाऱ्यांना पदावधीत अधिकारी करून त्यांचे नियंत्रणाखाली औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात अन्न सुरक्षा व मानदे कायद्याची अंमलबजावणी सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक :-** श्री.संजय किसनराव केनेकर,श्री.किशोर बाबुराव नागरे.

**अनुमोदक :-** श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली.

मा.महापौर :- प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करुन आरोग्यप्रमुख हे कायद्याने वैधानिक पद असुन अन्न सुरक्षा कायद्यानुसार त्यांना किंवा अर्हताधारक केलेल्या अधिकाऱ्यांना पदावधीत अधिकारी करून त्यांचे नियंत्रणाखाली औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात अन्न सुरक्षा व मानदे कायद्याची अंमलबजावणी सुरू करण्या करीता नियमाप्रमाने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४२ अंतर्गत मकसुद कॉलनी, रोशनगेट, येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे, यासाठी १० लक्ष (अक्षरी दहा लक्ष रुपये) ची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामाऐवजी वॉर्ड क्र ४२ अंतर्गत अरुंद गल्ल्यांमध्ये देखभाल दुरूस्तीसाठी रक्कम रुपये १०.०० लक्ष (अक्षरी दहा लक्ष रुपये) चे लेखाशिर्ष बदुलन खालीलप्रमाणे (फुटकळ) कामांसाठी तरतुद करण्यात यावी.

| सन २०१४-१५ करीता स्पिल ओव्हर कॉलोनी यादीतील अ.क्र. कामाचे नाव व रक्कम | लेखाशिर्ष बदलुन करावयाची कामे |
|---|---|
| अ.क्र.३ ward-C Spill ४७ मकसुद कॉलोनी अंतर्गत नाल्यास संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे. रक्कम रुपये १०.०० दहा लक्ष | १) वॉर्ड क्र ४२ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन व मेन होल दुरूस्ती करणे. ३.०० लक्ष (तीन लक्ष)<br>२) वॉर्ड क्र. ४२ अंतर्गत विविध ठिकाणी अरुंद गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटींग व पेव्हर ब्लॉक दुरूस्तीसाठी रक्कम ५.०० लक्ष (पाच लक्ष)<br>३) वॉर्ड क्र. ४२ अंतर्गत विद्युतीकरण व देखभाल दुरूस्ती करणे. रक्कम २.०० लक्ष (दोन लक्ष) |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.मुजीब आलम शाह खान, **अनुमोदक :-** डॉ.खान नुझत तरन्नुम

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४२ अंतर्गत मकसुद कॉलनी, रोशनगेट येथील खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१४-१५ करीता स्पिल ओव्हर कॉलोनी यादीतील अ.क्र. कामाचे नाव व रक्कम | लेखाशिर्ष बदलुन करावयाची कामे |
|---|---|
| अ.क्र.३ ward-C Spill ४७ मकसुद कॉलोनी अंतर्गत नाल्यास संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे. रक्कम रुपये १०.०० दहा लक्ष | १) वॉर्ड क्र ४२ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन व मेन होल दुरूस्ती करणे. ३.०० लक्ष (तीन लक्ष)<br>२) वॉर्ड क्र. ४२ अंतर्गत विविध ठिकाणी अरुंद गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटींग व पेव्हर ब्लॉक दुरूस्तीसाठी रक्कम ५.०० लक्ष (पाच लक्ष)<br>३) वॉर्ड क्र. ४२ अंतर्गत विद्युतीकरण व देखभाल दुरूस्ती करणे. रक्कम २.०० लक्ष (दोन लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र २५ येथील एन-७ सिडको येथील स्टेडीयमचे काम पुर्णत्वाकडे आहे. सदर स्टेडीयमला रामलीला क्रिडा संकुल असे नाव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.काशीनाथ हरीभाऊ कोकाटे,श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

**अनुमोदक :-** श्री.अशोक किसनराव बेहडे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र २५ येथील एन-७ सिडको येथील स्टेडीयमला रामलीला क्रिडा संकुल असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

| अ.क्र. | प्रस्तावित कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले वॉर्ड नं ५५ येथे विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे वॉर्ड क्र सन २०१२-१३ मधील पेज क्र. २३ GBR-C-९ अ.क्र. १२ रु. ५.०० लक्ष | वॉर्ड क्र ५५ कैसर कॉलनी मधील विविध ठिकाणी विद्युत पोल लाईट फिटींगचे फुटकळ कामे करणे रु. ५.०० लक्ष |
| २ | वॉर्ड नं ५५ कैसर कॉलनी चौधरी मंगल कार्यालय बाबु यांच्या गल्लीतील दुषीत पाणी बंद करण्यासाठी व पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध ठिकाणी १०० व १५० मि.मि.जलवाहीनी टाकणे वॉर्ड C स्पील-६७ अ.क्र.०६ सन २०१४-१५ | वॉर्ड क्र ५५ कैसर कॉलनी मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन व चेंबर बांधणेचे फुटकळ कामे करणे रु. ५.७१ लक्ष |

**सुचक :-** श्री. शहानवाज खान रहेमान **अनुमोदक :-** श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५५ अंतर्गत अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | प्रस्तावित कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले वॉर्ड नं ५५ येथे विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे वॉर्ड क्र सन २०१२-१३ मधील पेज क्र. २३ GBR-C-९ अ.क्र. १२ रु. ५.०० लक्ष | वॉर्ड क्र ५५ कैसर कॉलनी मधील विविध ठिकाणी विद्युत पोल लाईट फिटींगचे फुटकळ कामे करणे रु. ५.०० लक्ष |
| २ | वॉर्ड नं ५५ कैसर कॉलनी चौधरी मंगल कार्यालय बाबु यांच्या गल्लीतील दुषीत पाणी बंद करण्यासाठी व पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध ठिकाणी १०० व १५० मि.मि.जलवाहीनी टाकणे वॉर्ड C स्पील-६७ अ.क्र.०६ सन २०१४-१५ | वॉर्ड क्र ५५ कैसर कॉलनी मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन व चेंबर बांधणेचे फुटकळ कामे करणे रु. ५.७१ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानातील धबधब्याच्या ठिकाणी श्री.शंकराची भव्य मुर्ती बसविण्यात यावी अशी मागणी शहरातील सर्व भक्तांची इच्छा आहे. तरी सर्व शिवभक्तांच्या भावनेचा आदर करून धबधब्याच्या ठिकाणी श्री.शंकराची भव्य मुर्ती बसविण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.अनिल श्रीकिसन मकरिये,श्री.किशोर बाबुराव नागरे
**अनुमोदक :-** श्री.संजय रामदास जोशी,श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे, श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी
मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानातील धबधब्याच्या ठिकाणी श्री.शंकराची भव्य मुर्ती बसविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील मुळ काम | र.रु. लाखात | करावयाचे कामाचे नाव | र.रु. लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग-फ, स्पील-१३३ अ.क्र.-१ वॉर्ड क्र ५० कॅनॉट परिसरात जलनिसारण वाहिनी टाकणे २७.०० लक्ष | ५० लक्ष | १. प्रभाग क्र ५० अंतर्गत अहिंसानगर येथे रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे | २७ लक्ष |

**सुचक :-** श्री.प्रशांत सुभाष देसरडा **अनुमोदक :-** श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील खालील सुधारीत कामाचे लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील मुळ काम | र.रु. लाखात | करावयाचे कामाचे नाव | र.रु. लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग-फ, स्पील-१३३ अ.क्र.-१ वॉर्ड क्र ५० कॅनॉट परिसरात जलनिसारण वाहिनी टाकणे २७.०० लक्ष | ५० लक्ष | १. प्रभाग क्र ५० अंतर्गत अहिंसानगर येथे रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे | २७ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४२ वार्ड क्र.८५ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. | ०१. सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४२ वार्ड क्र.८५ अंतर्गत विशाल पार्क समोर श्रीनगर हौसिंग सोसायटी मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. |
| ०२ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.३९ वार्ड क्र.८५ अंतर्गत काबरानगर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१०.०० लक्ष. | ०२. सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.३९ वार्ड क्र.८५ अंतर्गत कासलीवाल सुवर्ण योग येथे पेव्हर ब्लॉक बसविणे व विशाल पार्क समोर जॉगिंग ट्रॅक तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर. **अनुमोदक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव
मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४२ वार्ड क्र.८५ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. | ०१. सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४२ वार्ड क्र.८५ अंतर्गत विशाल पार्क समोर श्रीनगर हौसिंग सोसायटी मध्ये |

| | | |
|---|---|---|
| ०२ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.३९ वार्ड क्र.८५ अंतर्गत काबरानगर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१०.०० लक्ष. | सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>०२. सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.३९ वार्ड क्र.८५ अंतर्गत कासलीवाल सुवर्ण योग येथे पेव्हर ब्लॉक बसविणे व विशाल पार्क समोर जॉगिंग ट्रॅक तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२५ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात पान क्र.SCR-E-१६ वर विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे करणे (फुटकळ कामे वगळुन) या लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.०३ वर वार्ड क्र.७० अंतर्गत कॉंक्रीट रस्ते, डांबरी रस्ते पुनर्डांबरीकरण, ड्रेनेज लाईन टाकणे, विकास योजने अंतर्गत भुखंड, संरक्षण खुल्या गटारी व इतर विविध विकास कामे करणे या शीर्षकातंर्गतची तरतुद. | ५० लाख | ०१ | वार्ड क्र.७०-विद्यानगर अंतर्गत कचरा संकलनासाठी डस्ट बिन बसविणे. | १० लाख |
| | | | ०२ | वार्ड क्र.७० अंतर्गत साई कॉर्नर ते श्री पाठक यांच्या घरापर्यंतची जुनी ड्रेनेज लाईन बदलुन नवीन टाकणे. | २० लाख |
| | | | ०३ | वार्ड क्र.७० अंतर्गत आदिनाथनगर मल्हार चौक ते जवाहनगर पोलिस स्टेशन या रस्त्यालगत कडेने गट्टु बसविणे. | २० लाख |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.समीर सुभाष राजुरकर. **अनुमोदक:-** श्री.संजय सांडु चौधरी.

मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात पान क्र.SCR-E-१६ वर विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे करणे (फुटकळ कामे वगळुन) या लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.०३ वर वार्ड क्र.७० अंतर्गत कॉंक्रीट रस्ते, डांबरी रस्ते पुनर्डांबरीकरण, ड्रेनेज लाईन टाकणे, विकास योजने अंतर्गत भुखंड, संरक्षण खुल्या गटारी व इतर विविध विकास कामे करणे या शीर्षकातंर्गतची तरतुद. | ५० लाख | ०१ | वार्ड क्र.७०-विद्यानगर अंतर्गत कचरा संकलनासाठी डस्ट बिन बसविणे. | १० लाख |
| | | | ०२ | वार्ड क्र.७० अंतर्गत साई कॉर्नर ते श्री पाठक यांच्या घरापर्यंतची जुनी ड्रेनेज लाईन बदलुन नवीन टाकणे. | २० लाख |
| | | | ०३ | वार्ड क्र.७० अंतर्गत आदिनाथनगर मल्हार चौक ते जवाहनगर पोलिस स्टेशन या रस्त्यालगत कडेने गट्टु बसविणे. | २० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२६ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा परिषद किंवा शासन मान्यता असलेल्या शाळांचे शिक्षक/मुख्याध्यापक यांचे या पुर्वी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात सेवा वर्ग झालेली असून श्रीमती कौसर तसनीम या एम.ए.,बी.एस्सी.,बी.एड. असून मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत मुख्याध्यापिका (माध्यमिक) म्हणुन मान्यता असलेल्या नियमिती रिक्त पदावर कार्यरत असून त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेत त्यांचे वेतन व सेवा संरक्षण देऊन शिक्षण विभागात मुख्याध्यापिका माध्यमिक/प्राथमिक/सहशिक्षीका किंवा समतुल्य पदावर त्यांची सेवा वर्ग करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक :-** श्री.प्रशांत सुभाष देसरडा, श्री.संजय रामदास जोशी, श्री.संजय किसनराव केनेकर श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद, श्री.समीर सुभाष राजुरकर, श्री.अफसर खान यासीन खान,

**अनुमोदक** :- श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे, श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, डॉ.जफर अहेमद, श्री.काशीनाथ हरीभाऊ कोकाटे, श्री. मिलींद यशवंतराव दाभाडे

मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती कौसर तसनीम या एम.ए.,बी.एस्सी.,बी.एड. असून मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत मुख्याध्यापिका (माध्यमिक) म्हणुन मान्यता असलेल्या नियमित रिक्त पदावर कार्यरत असून त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेत त्यांचे वेतन व सेवा संरक्षण देऊन

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात मुख्याध्यापिका माध्यमिक/प्राथमिक/सहशिक्षीका किंवा समतुल्य पदावर पदस्थापना देऊन त्यांची सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भुतपुर्व नगरपरिषदेचे क्षेत्र सुमारे ५४ चौ.कि.मी. होते नंतर दिनांक ०८.१२.१९८२ पासुन महानगरपालिका अस्तित्वात आल्याने अठरा खेडी/गावंचा समावेश होऊन महानगरपालिकेचे क्षेत्र सुमारे १४० चौ.कि.मी. इतके झाले.

हे शहर आशिया खंडातील जलदगतीने विकसित होणारे शहर असून शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला असून शहरालगतचा परिसर देखील विकसीत झालेला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार घटनेच्या अनुच्छेद २४३-थ, अन्वये अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी महानगरपालिका घटीत करण्याची तरतुद असुन, त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये दुरूस्त्या झालेल्या आहे. त्या दुरूस्त्या प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ (३) (अ) नुसार महानगरपालिकेच्या शिफारसी वरुन महानगरपालिका हद्दीचे क्षेत्र वाढविता येईल किंवा वगळता येईल आणि त्याचप्रमाण कलम ५ (४) अन्वये विस्तारीत क्षेत्रासाठी शक्यतितक्या लवकर निवडणुक घेण्याची तरतुद आहे.

नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले त्यावेळी हद्द, सीमा निश्चित करतांना दक्षिणेकडील भाग नगरपरिषदेच्या हद्दी पर्यंतच असल्याचे नमुद आहे. त्या नुसार महानगरपालिका हद्दीसाठी विकास योजना तयार करण्यात आली त्यात मंजूर विकास योजनेनुसार दक्षिणेकडील क्षेत्र बिड वळण रस्त्याच्या दक्षिणेकडील नाल्यापर्यंत व एम.आय.टी. कॉलेजच्या पाठीमागील टेकडया पर्यंत हद्द आहे.

शहराची भौगोलिक परिस्थितीचा व शहराचा विकास लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या हद्दीत या भागातील विकास जलदगतीने व्हावा जनतेला मुलभुत सुविधेसह आवश्यक त्या भौतिक सोयी देखील उपलब्ध व्हाव्यात त्याचप्रमाणे समांतर जलवाहिनी व भुमिगत गटार योजना व रस्ते विकासासाठी प्राप्त अनुदानातून सध्या महापालिका क्षेत्रात चालु असलेल्या योजने अंतर्गत सतारा नगरपरिषदेचा समावेश करुन या योजनेअंतर्गत वाढीव निधी केंद्र शासन व राज्यशासनाकडून उपलब्ध करुन घेऊन शहर व परिसराचा विकास जलदगतीने करता येण् शक्य होईल.

या करिता शासनाने सातारा नगरपरिषद म्हणून घोषित केलेले संपुर्ण क्षेत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कलम ३ (३) (अ) च्या तरतुदीस अधीन राहून महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यासाठी व राज्यशासनास तशी शिफारस करण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे.

**अनुमोदक:-**श्री.राजु दत्तोपंत वैद्य, श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये, श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने

**संवाद**

श्री.संजय चौधरी : सन १९८२ ला महानगरपालिकेत चिकलठाणा,मुकूंदवाडी नारेगांव, हर्सुल पडेगाव मिटमिटा नक्षत्रवाडी हा असे एकूण १८ खेडी यांचा समावेश झालेला आहे त्या भागाचा अद्याप विकास झालेला नाही असे असतांना सातारा या भागाचा महापालिकेत समावेश करून घेत असेल तर १८ खेडी जे समावेश केले त्याचा अगोदर विकास केला पाहिजे शासन या भागाच्या विकासाकरीता निधी देत असेल तर मंजूरी देण्यास हरकत नाही.

श्री.किशोर नागरे :शासन आपलेच आहे निधी मिळवता येईल.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रशांत देसरडा :शासन कुणाचे जरी असेल ,परंतु जनतेने आपणांस निवडुण दिले आहे.मागिल वर्षी अशाच प्रकारचा ठराव आलेला होता त्यास नामंजूर केले होते.त्यावेळेस सभागृहाच्या पण याच भावना होत्या सातारा देवळाई नगरपरिषद आज जे होत आहे तेथ्रील ड्रॉ निघाला व वार्ड रचनाही झाली आहे.त्या नागरीकांना काय द्यायला पाहिजे हा आपला विषय असू शकतो.त्यांना समांतरचे पाणी १०० टक्के दिले पाहिजे. जर हा भाग हस्तांतर करायचा असेल व अशासकीय प्रस्ताव येत असेल तर प्रशासनाची बाजू सुध्दा आपण ऐकूण घेतली पाहिजे.हे सामावून घेत असेल तर भौगोलिक दृष्टया काय माहिती आहे येथे विकास करण्या करीता किती पैसा लागणार आहे.तेथील नागरीकांना इमारत बांधकामासाठी व टॅक्स साठी किती रक्कम मोजावी लागणार आहे. हा जो प्रस्ताव आहे तो प्रशासनाकडून प्लॅनींग होऊन विकासासाठी किती खर्च लागणार तसा प्रस्ताव प्रशासनाने ७ दिवसाच्या आत आणावा त्यानंतर त्यार चर्चा करावी अशी विनंती.

श्री.रेणुकादास वैद्य :त्या भागातील नागरीक व सर्व लोकप्रतिनिधीची गेल्या १० वर्षापासून मागणी आहे. त्या भागातील नागरीकांना तेथील असलेली नगरपालिका आता जी आस्तित्वात येणार आहे पुर्वी होती ती ग्रामपंचायत.तेथील नागरीकांना पाहिजे तसा इन्फ्रॉस्क्चर घेवू दिला नाही.शहराच्या लगत भाग असल्यामुळे तेथे डेव्हलपमेंन्ट अतिशय मोठयाप्रमाणात होत आहे.कसलेही प्लॅनींग तेथे होत नाही.झालर क्षेत्र, सिडको, नगरपालिका, महानगरपालिका असेल या विविध एजन्सीच्या माध्यमातून तेथील प्लॅनींग ऑथर्टी कोण असा प्रश्न कायम ऐरणीवर आला. त्यामुळे तेथे अनधिकृत बांधकाम होत आहे. प्लॅनींग होत नाही हे महापालिकेत आले तर या भागास पाणी,ड्रेनेज व इतर सर्व सुविधा देता येईल तेथील नागरीकांच्या भावणा लक्षात घेवून हा ठराव मंजूर करावा शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

श्री.प्रशांत देसरडा :यास आमचा विरोध नाही हा अशासकीय प्रस्ताव आहे विकास साठी किती पैसे लागणार हे माहित नाही.प्रशासना मार्फत हा ठराव यावा शासनाकडून निधी मागवू शकतो.कोणत्या नागरीकांनी मागणी केली पत्र दिले आम्हाला माहित नाही.असेल तर ते सभागृहात वाचून दाखवावे.एक वर्षापुर्वी ठराव आला होता तो रद्य केला.हा प्रशासकीय प्रस्ताव यावा. त्यानंतर कार्यवाही व्हावी

श्री.रेणुकादास वैद्य :अशासकीय प्रस्ताव असला तरी शासनाच्या मंजूरी शिवाय हे होणार नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : स.श्री.देसरडा व मी आम्ही या संदर्भात कोर्टात गेलो होते नगरपालिका स्थापन करीत असतांना जे गट नं. डिक्लेर केले होते त्यावर सजेशन आब्जेक्शन मागितले होते महापालिकेने अनेक गट नंबर नगरपालिकेमध्ये घेतलेले आहे.ते होऊ शकते तर आता महापालिकेमध्ये सर्व समाविष्ट करून विकास करू दाखवावा.

श्री.प्रशांत देसरडा :असे असेल तर येथील व सातारा-याची जनता तुम्हाला विचारेल की हा निर्णय कोणी घेतला कोर्ट मॅटर आहे हे विसरलो.कोर्ट मॅटर असतांना ठराव कसा येतो.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.विजय वाघचौरे :यापुर्वी मा.आमदार यांनी पत्रव्यवहार करून महानगरपालिकेत हे सामावेश करून घ्यावे मागणी केली आहे तेथील नागरीकांनी मागणी केली. समावेश करावे हा विषय मंजूर करावा.

श्री.किशार नागरे :यात ज्यांना सुचक व अनुमोदक म्हणून नाव दयायचे असेल ते घ्यावे.

मा.महापौर :७२७ हा विषय स्विकृतीसह मंजूर करण्यात येतो. तसेच या मध्ये काही स.सदस्यांची नावे सुचक व अनुमोदक म्हणून घेण्यात यावेत.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावास सुचक म्हणून श्री.संजय जोशी,व श्री.संजय केनेकर तसेच अनुमोदक म्हणून श्री.पंकज भारसाखळे व श्री.बबन नरवडे यांचे नाव समाविष्ट करण्यास आणि शासनाने सातारा नगरपरिषद म्हणून घोषित केलेले संपुर्ण क्षेत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कलम ३ (३)(अ) च्या तरतुदीस अधीन राहून तसेच शहराची भौगोलिक परिस्थितीचा व शहराचा विकास लक्षात घेऊन या भागातील विकास जलदगतीने व्हावा जनतेला मुलभुत सुविधेसह आवश्यक त्या भौतिक सोयी देखील उपलब्ध व्हाव्यात त्याचप्रमाणे समांतर जलवाहिनी व भुमिगत गटार योजना व रस्ते विकासासाठी प्राप्त अनुदानातून सध्या महापालिका क्षेत्रात चालु असलेल्या योजने अंतर्गत सातारा नगरपरिषदेचा समावेश करुन या योजनेअंतर्गत वाढीव निधी केंद्र शासन व राज्यशासनाकडून उपलब्ध करुन घेऊन शहर व परिसराचा विकास जलदगतीने होण्यासाठी सातारा नगर परिषद म्हणुन घोषित झालेले संपुर्ण क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यासाठी व राज्यशासनास तशी शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.प्रशांत देसरडा :जनता तुम्हाला प्रश्न विचारेल आमची घेण्यास हरकत नाही परंतु प्रशासनाकडून येवू दयावे. राजकीय उद्देशासाठी घेवू नये जनता माफ करणार नाही. प्रशासनाकडून हा प्रस्ताव यावा किती खर्च लागणार आहे ते येईल ७ दिवसात प्रस्ताव मागवा. किती खर्च लागणार जनतेला कळू द्यावे.

**विषय क्रमांक ७२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६७, उत्तमनगर, बौध्दनगर येथे हॉटेल संगम समोरील गल्लीच्या प्रवेशाच्या ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते बौध्दवासी बाबाभाई रामभाऊ शेजुळ यांच्या नावे लोकवर्गणीतून कमान बसविण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अशोक किसनराव बेहडे. **अनुमोदक:-** श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव.

सौ.शोभा काळे :हा प्रस्ताव माझ्या वार्डातील आहे मला कल्पना दिली नाही.

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६७, उत्तमनगर, बौध्दनगर येथे हॉटेल संगम समोरील गल्लीच्या प्रवेशाच्या ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते बौध्दवासी बाबाभाई रामभाऊ शेजुळ यांच्या नावे लोकवर्गणीतून कमान बसविण्यास दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते स्व.प्रभाकर दादा पुराणिक यांनी आपल्या शहरात २०-२५ वर्षापुर्वी सावरकर प्रेमी मित्रमंडळाची स्थापना केली. या मित्रमंडळाच्या माध्यामातून स्वातंत्र्यवीरांचे विचार नवीन पिढीला ज्ञात व्हावे या हेतुने नियमीतपणे व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. सन २००७ मध्ये प्रभाकरदादा पुराणिक यांचे दु:खद निधन झाले. अशा सावरकरप्रेमी व्यक्तीचे स्मरण शहरवासीयांना व्हावे याकरीता सावरकर चौक ते नुतनकॉलनी सिग्नल या रस्त्यास **"स्वर्गीय प्रभाकर दादा पुराणिक मार्ग"** असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.समीर सुभाष राजुरकर. **अनुमोदक:-** श्री.संजय रामदास जोशी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावरकर चौक ते नुतनकॉलनी सिग्नल या रस्त्यास **"स्वर्गीय प्रभाकर दादा पुराणिक मार्ग"** असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टाईम्स कॉलनी लगत मस्तान प्लॉटींगवाले हे नैसर्गिक नाले दोन्ही बाजुने बुजवून भरती टाकुन रुंदी कमी करत आहेत व पुढेही आणखी कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. सदर दक्षिणेकडील नाला व उत्तरेकडील नाला यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येवून तात्काळ कारवाई करण्यात यावी. पुढे भविष्यात नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अरुंद झाल्यामुळे जिवीत व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याचा धोका आहे.

तरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जहाँगीर खान अब्बास खान **अनुमोदक:-** श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली.

या वेळी स.श्री.जहागीर खान यांनी नेहरूनगर कटकट गेटच्या लगत टाईम्स कॉलनी पर्यंतच्या नाल्यामध्ये काही भु-माफीया भरती टाकून नाला अरूंद करीत आहे या बाबत कार्यवाही करण्या संदर्भात सभागृहात फलक दाखवितात. कार्यवाही करण्याची मागणी करतात.

श्री.जहागींर खान :टाईम्स कॉलनी लगत नैसर्गीक नाला दोन्हीबाजूने भरती टाकून प्लॉटींग करीत आहे त्यावर कार्यवाही का होत नाही.

मा.महापौर :डायरेक्ट असे फलक सभागृहात आणणे योग्य नाही. जी मागणी आपण करता तो प्रस्ताव यात आहे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :या प्रस्तावानुसार प्रशासनाने त्या ठिकाणचे अतिक्रमण ताबडतोब काढण्याची कार्यवाही करावी. हा विषय मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाईम्स कॉलनी लगत नैसर्गिक नाल्याचा नैसर्गिक प्रवाह दक्षिणेकडील व उत्तरेकडील ठिकाणी भरती टाकून केलेल्या अतिक्रमणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन नियमाप्रमाणे योग्य ती तात्काळ कारवाई करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरुनगर कटकट गेट लगतच्या नाल्यापासुन ते टाईम्स कॉलनीच्या नाल्यापर्यंत उजव्या व डाव्याकडील नाल्यात भरती टाकून नाल्याची रुंदी कमी

करुन होत असलेले अतिक्रमण तात्काळ थांबविणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. कारण की भु-माफिया जमीन लेव्हल करुन जमीन विक्री करुन टाकण्याच्या बेतात आहे जर असे झाल्यास पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह जास्त होऊन नागरिकांच्या घरात शिरुन घरे पडून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच मोतीवाला शाळेच्या जवळील बेकरीच्या बाजुला पाच मजली इमारतीचा बेकायदेशीर बांधकाम तात्काळ पाहणी करुन कार्यवाही करण्यात यावी.

तरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जहाँगीर खान अब्बास खान **अनुमोदक:-** श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२८ नेहरुनगर कटकट गेट लगतच्या नाल्यापासुन ते टाईम्स कॉलनीच्या नाल्यापर्यंत उजव्या व डाव्याकडील नाल्यात होत असलेले अतिक्रमण तसेच मोतीवाला शाळेच्या जवळील बेकरीच्या बाजुला पाच मजली इमारतीच्या बांधकामाची तात्काळ पाहणी करुन नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५८ कैलासनगर येथील कै.महेंद्र खोंडे हे या भागातील सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी या भागात बरेच सामाजपयोगी कामे कलेली असल्यामुळे, त्यांचे नांव सदैव लोकांच्या मनात राहावे म्हणुन हॉटेल बग्गा ते राममंदिर या रस्त्याला “कै.महेंद्र खोंडे मार्ग” तसेच दर्गा कुतुबशहा बाबा हे दादा कॉलनी या भागातील श्रध्दास्थान असल्यामुळे दादा कॉलनी मुख्य रस्त्याला “दर्गा कुतुबशहा बाबा मार्ग” असे नांव देण्याबद्दल या भागातील नागरीकांनी मागणी कली आहे.

करीता हॉटेल बग्गा ते राममंदिर या रस्त्याला “कै.महेंद्र खोंडे मार्ग” व दादा कॉलनी मुख्य रस्त्याला “दर्गा कुतुबशहा बाबा मार्ग” असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. आगा खान मिया खान **अनुमोदक:-** श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी.

मा.महापौर :नामकरण समितीकडे पाठविण्यात येते.

---

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल बग्गा ते राममंदिर या रस्त्याला “कै.महेंद्र खोंडे मार्ग” व दादा कॉलनी मुख्य रस्त्याला “दर्गा कुतुबशहा बाबा मार्ग” असे नांव देण्यासाठी प्रस्ताव नामकरण समितीकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

---

**विषय क्रमांक ७३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२५ एन-७ सिडको येथे महानगरपालिकेचे उद्यान आहे. या भागातील नागरीकांनी या उद्यानास **“जिजाऊ उद्यान”** असे नांव देण्याची मागणी केली आहे.

करीता वरील प्रमाणे भागातील उद्यानास **“जिजाऊ उद्यान”** असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. काशीनाथ हरिभाऊ कोकाटे

**अनुमोदक:-** श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली, श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी.

श्री. काशीनाथ कोकाटे :या प्रस्तावात राजमाता जिजाऊ उद्यान असे नाव देण्याची दुरूस्ती करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५ एन-७ सिडको येथील उद्यानास **"राजमाता जिजाऊ उद्यान"**असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३४:-**

विषय क्रमांक ०१ :- प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी येथे मिनारा कब्रस्तान येथे विकास करणेस रुपये ४,९८,०००/- चे काम मंजुर असून सदर कामाचे निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. स्थानिक नागरिकांनी सदर कामावर हरकत घेतली असल्यामुळे सदरचे मंजुर काम मिनारा कब्रस्तान ऐवजी लगतच असलेल्या चंम्पा मस्जीद कब्रस्तान येथे स्थळ बदलून मंजुर दरावर अंदाजपत्रक दुरुस्ती करुन काम सुरु करण्याची मान्यता व्हावी.

विषय क्रमांक ०२ :- तसेच मिनारा कब्रस्तान येथे नियोजीत असणाऱ्या प्रार्थना सभागृहावर पहिला मजला बांधणेसाठी मंजुर रु.४,९९०७३/- चे काम स्थळ बदलुन चंम्पा मस्जीदच्या उत्तरेकडील भागात R.C.C. फेम मध्ये शौचालय बांधणेस स्थळ बदलाची मान्यता अंदाजपत्रक दुरुस्त करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता व्हावी.

**सुचक:-** श्री. शहानवाज खान रहेमान खान **अनुमोदक:-** श्री.बबन पंडितराव नरवडे

मा.महापौर :विषय मंजुर.नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५५ अंतर्गत अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

विषय क्रमांक ०१ :- वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी येथे मिनारा कब्रस्तान येथे विकास करणेस रुपये ४,९८,०००/- चे काम मंजुर असून सदर कामाचे निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. स्थानिक नागरिकांनी सदर कामावर हरकत घेतली असल्यामुळे सदरचे मंजुर काम मिनारा कब्रस्तान ऐवजी लगतच असलेल्या चंम्पा मस्जीद कब्रस्तान येथे स्थळ बदलून मंजुर दरावर अंदाजपत्रक दुरुस्ती करुन काम सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते.

विषय क्रमांक ०२ :- तसेच मिनारा कब्रस्तान येथे नियोजीत असणाऱ्या प्रार्थना सभागृहावर पहिला मजला बांधणेसाठी मंजुर रु.४,९९०७३/- चे काम स्थळ बदलुन चंम्पा मस्जीदच्या उत्तरेकडील भागात R.C.C. फेम मध्ये शौचालय बांधणेस स्थळ बदलाची मान्यता अंदाजपत्रक दुरुस्त करुन पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३५ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.न.१८९ हर्सुल औरंगाबाद येथे ६१ प्लॉट धारकांची वस्ती असून त्या सर्वांनी मिळून या गृहनिर्माण सोसायटीला सप्तश्रृंगी कॉलनी असे नामकरण करण्याचे ठरविले असून या सोसायटीला सप्तश्रृंगी कॉलनी असे नाव देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**अनुमोदक:-** श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये, श्रीमती शोभा पुखराज काळे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.न.१८९ हर्सुल औरंगाबाद येथील ६१ प्लॉट धारकांची सोसायटीला सप्तश्रृंगी कॉलनी असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३६ :-**

१. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ बळीराम पाटील विद्यालयाच्या बाजुस असलेल्या जागेवर लॉन लावण्यात आलेली आहे. त्या लॉन्स चे नाव मातोश्री लॉन्स असे देण्यात यावे.

२. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र १९ शिवनेरी कॉलनी, म्हाडा कॉलनी, या वॉर्डामधून जाणारा रोड आंबेडकर चौक ते बळीराम पाटील हायस्कुल चौकापर्यंतच्या रस्त्यास स्वर्गीय मोतीलालजी जुगललालजी जैस्वाल मार्ग असे नाव देण्यात यावे.

**सुचक :-** श्री.अनिल जुगललाल जैस्वाल, श्री.किशोर बाबुराव नागरे,

**अनुमोदक :-** श्रीमती शोभा पुखराज काळे, श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) वॉर्ड क्र.१९ बळीराम पाटील विद्यालयाच्या समोरील रस्त्यालगत असलेल्या लॉनला मातोश्री लॉन असे नाव देण्यास तसेच (२) वॉर्ड क्र १९ शिवनेरी कॉलनी, म्हाडा कॉलनी, या वॉर्डामधून जाणाऱ्या आंबेडकर चौक ते बळीराम पाटील हायस्कुल चौकापर्यंतच्या रस्त्यास स्वर्गीय मोतीलालजी जुगललालजी जैस्वाल मार्ग असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जवाहरनगर पोलिस स्टेशनच्या चौकातून मल्हार चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच सुतगिरणी चौकातून काबरानगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर महानगरपालिकतर्फे स्वागत कमान बसविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर **अनुमोदक :-** श्री. मनिष चंद्रकांत दहिहंडे

मा.महापौर :- विषय मंजुर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहरनगर पोलिस स्टेशनच्या चौकातून मल्हार चौकाकडे जाणारा रस्ता तसेच सुतगिरणी चौकातून काबरानगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर स्वागत कमान बसविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ८३ पुंडलिकनगर येथील न्यु हनुमान नगर चौक येथे संध्याकाळी /रात्रीच्या वेळी समाज कंटकाकडून महिलांची छेड काढणे, लुटमारी करणे, अशा अनेक घटना नेहमीच घडत आहे. याला आळा घालण्यासाठी या भागात पोलिस चौकी व्हावी अशी जनतेची मागणी आहे. मा.पोलिस आयुक्तालय यांच्या वतीने मनपास पत्राद्वारे विनंती केली आहे की, सुरक्षीततेच्या दृष्टिकोनातून शहरात आवश्यक त्या ठिकाणी मनपाने जागा उपलब्ध करून दिल्यास त्या ठिकाणी पोलिस चौकी सुरू करू असे कळविले आहे. वरील ठिकाणी पोलिस चौकी होणे अत्यंत गरजेचे आहे. करीता पाण्याच्या टाकीच्या खाली रोडच्या कडेला पोलिस चौकीसाठी मनपाने तात्पुरत्या स्वरूपात चौकीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सादर.

**सुचक :-** श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये, श्री.किशोर बाबुराव नागरे,
**अनुमोदक :-** श्रीमती शोभा पुखराज काळे, श्री.समिर सुभाष राजुरकर
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर येथील न्यु हनुमान नगर चौक येथे संध्याकाळी /रात्रीच्या वेळी समाज कंटकाकडून महिलांची छेड काढणे, लुटमारी करणे, अशा अनेक घटना नेहमीच घडत असल्याने याला आळा घालण्यासाठी या भागात पाण्याच्या टाकीच्या खाली रोडच्या कडेला पोलिस चौकीसाठी मनपाने तात्पुरत्या स्वरूपात चौकीसाठी जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

मा.महापौर :ऐनवेळचे स.सदस्याचे विषय दुरूस्तीसह मंजूर प्रशासनाचे विषय मंजूर.

**विषय क्रमांक ७३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २०.१२.२०१४ रोजी बैठकीतील विषय क्रमांक ६६८ स्थगिती दिनांक २१.०१.२०१५ स्थगित केला होता. तो पुन्हा सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्ज मागणी प्रस्तावानुसार आय.डी.बी.आय. बँकेने खालील नमुद बाबीं करिता १.एम.एस.ई.डी.सी.एल. चे थकीत विद्दुत देयकाची अदाई करणे, २.समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी Water Payment Reserve Account मध्ये रक्कम जमा करणेसाठी रु.२०० कोटींचे कर्ज देणेसाठी डिसेंबर २०११ मध्ये मान्यता दिलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने सदर कर्जा संबधाने आय.डी.बी.आय बँकेसोबत दि.२५/४/१२ ला करार केला आहे. सदरील कर्ज मिळणे करिता केलेल्या कराराच्या अटी शर्तीनुसार आय.डी.बी.आय बँकेकडुन कर्ज उभारणीच्या कार्यवाही अतंर्गत कर्ज सुरक्षा म्हणुन रु.३००.०० कोटीच्या मुल्यांच्या महानगरपालिकेच्या मिळकती बँकेकडे तारण ठेवण्याच्या कार्यवाहीतंर्गत यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.११७ दि.१९/१/२०१३ ने मंजुर केलेल्या ठरावासंबधाने त्यात नमुद २५ मिळकतीपैकी रक्कम रु.१५६.० कोटीच्या १५ मिळकती आय.डी.बी.आय. बँकेकडे कर्जसुरक्षा म्हणुन तारण ठेवण्यात आल्या आहेत. या ठरावात नमुद २५ मिळकतींपैकी उर्वरित १० मिळकतींच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्याने सदर मिळकतींच्या ऐवजी उर्वरित रक्कम रु.१४४.० कोटीच्या कर्ज सुरक्षा रक्कमे करिताच्या खालील नमुद १३ मिळकती कर्ज सुरक्षा म्हणुन बँकेकडे तारण ठेवावयाच्या आहेत. बँकेच्या गरजेनुसार बँकेने दिलेल्या इंग्रजी भाषेतील प्रस्तावाचा नमुना खालील प्रमाणे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

करिता खालील नमुद महानगरपालिकेच्या मिळकती आय.डी.बी.आय बँकेकडे तारण ठेवण्यास व त्यासंबधीची वैधानिक कार्यवाही करण्याचे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**Resolutions passed by the general body of Aurangabad Municipal Corporation in its meeting for creation of mortgage**

The mayor informed the General Body of Aurangabad Municipal Corporation (here in after to as the Corporatin or AMC ) that the Corporation has been sanctioned Rupee Term Loan of Rs.२०० crore (Rupees Two Hundred crore only) by IDBI Bank Ltd. (IDBI Bank) in the month of December २०११ for the following purpose:

To make payment of overdue electricity charges to Maharashtra State Electricity Distribution Company Ltd. And

To utilize for land acquisition and creating Water Payment Reserve Account in order to facilitate starting project of Paralled Water Supply Line in the city of Aurangabad.

The Mayor further informed the Genral Body that on April २५, २०१२, the Corporation enterd into Loan Agreement with IDBI Bank in connection with the aforesaid financial
assistance. as per the term and conditions, agreed for, would have to be secured also by mortgage of १३ immovable properties of the Corporation as mentioned herein below.

The Mayor accordingly requested the General Body to pass the following Resolutions to enable the Corporation to execute Legal Mortgage Deed (in English Mortgage Form) in favour of IDBI Bank creating charge there under, on the १३ immovable properties of the Corporation as mentioned herein under.

**Aurangabad Municipal Corporation**

०१. मो.वेदांत नगर, रेल्वेस्टेशन रोड येथील न.भु.क्र.१८३४९/१/९९ ज्याचे क्षेत्रफळ - ४०५७ चौ.मी, ता.जि.औरंगाबाद.

०२. मो.रेल्वेस्टेशन संत गाडगेबाबा व्यापारी संकुल न.भु.क्र.१९२५९/१ ज्याचे क्षेत्रफळ -१४४४ चौ.मी, ता.जि.औरंगाबाद.

०३. मो.रेल्वेस्टेशन संत गाडगेबाबा व्यापारी संकुल न.भु.क्र.१९२५९ ज्याचे क्षेत्रफळ - ४५१.४३ चौ.मी, ता.जि.औरंगाबाद.

०४. मो.पदमपुरा, Fire Brigades Complex रेल्वेस्टेशन रोड न.भु.क्र. १९६४५ ज्याचे क्षेत्रफळ - ६१६.९० चौ.मी, ता.जि.औरंगाबाद.

०५. मो.गारखेडा न.भु.क्र.१५७३५/१ ज्याचे क्षेत्रफळ - ६२९५ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

०६. मो.जयविश्वभारती कॉलनी सर्वे नं.६१(५) गारखेडा औरंगाबाद न.भु.क्र.१५७३५/१० ज्याचे क्षेत्रफळ - ३८७६.२० चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

०७. मो.शहानुरवाडी न.भु.क्र.१६३२१/१ ज्याचे क्षेत्रफळ - ४०४२.१७ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

०८. मो.शहानुरवाडी न.भु.क्र.१६३२१/३ ज्याचे क्षेत्रफळ - १५६३.१७ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

०९. मो.शहानुरवाडी न.भु.क्र.१६३२१/२ ज्याचे क्षेत्रफळ - ३९०५.१७ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

१०. मो.पदमपुरा न.भु.क्र.१९६६० ज्याचे क्षेत्रफळ - १५६८ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

११. मो.कांचनवाडी गट क्र. ४७/३ ज्याचे क्षेत्रफळ - ४४६१.०४ चौ.मी , ता.जि.औरंगाबाद.

१२. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे सर्वे नं.८० औरंगपुरा येथील नाथसुपर मार्केट नाल्यावरील इमारत.

१३. मो.क्रांतीचौक सर्वे नं.५४ ज्याचे क्षेत्रफळ - ८५०९.३४ , ता.जि.औरंगाबाद.

१. Together with all the building & structure constructed / erected thereon or to be constructed / erected thereon & all the fixed plant, machinery and fixtures & feeting permanently attachted to the earth or permanently fastend to anything attached to the earth or kept or lying theorem, both present & future [Immovable Properties & movebles assests are here in after collectively referred to as Properties] as security also for the due repayment, decharge & redemption by the corporation to IDBI bank of its rupee Term Loan fo Rs.२०० crore [Rupees Two Hundred crore only] together with interest, additional interest, Liquidated damage, Compound intrest premia or Prepayment or on

redemption, costs Charge & expence payble under the loan agreement / documents are amended from time to time.

२. The draft of the legal mortage Deed [in English form] recived from IDBI bank [copy where of duely initiated by the mayor for indentifications purpose, has been placed before the meeting] be & is hereby approved & municipal Commissioner of the corporation be &
is hereby singly authorized to accept on behalf of the corporation such modifications therin as may be suggested by IDBI bank & to execute the Legal Mortage Deed.

३. the comman seal of the municipal Corporation be affixed to the legal Mortage Deed in english form in Dulicate, in Presences of any two officials of the municipal corporation who shall sign the same in token thereof & authorized person who shall also sign the same in token thereof.

४. The Municipal Commissioner of the corporation be and is hereby authorized singly to approve & finalise such other deeds and document & to do all such other acts incidental there on as may be required by IDBI bank in connection with the said financial assistance & the comman seal if the Corporation to be affixed there on in the presence of any two officials of the Municipal Corporation who shall sign the same in taken there of & any authorised person who shall also sign the same in taken there of and in the event of the affixation of the comman seal not being required the same to be executed singly by the official afore mentioned.

५. The Municipal Corporation do file the requisite particulars relating the charge with approprivate authority / in form the state / central government as the case may within the time prescribed by law therefore.

सदर प्रस्ताव मान्यतेनंतर महानगरपालिकेच्या उपरोक्त नमुद मिळकती तारण ठेवण्यासंदर्भात पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्ज मागणी प्रस्तावानुसार आय डी बी आय बँकेने प्रस्तावात नमुद बाबीकरीता १. एम एस ई डी सी एल चे थकीत विद्युत देयकाची अदाई करणे २. समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी Water payment Reserve Account मध्ये रक्कम जमा करणेसाठी रू. २०० कोटीचे कर्ज देणेसाठी डिसेंबर २०११ मध्ये दिलेल्या मान्यतेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेने सदर कर्जा संबधाने आय.डी.बी.आय.बँकेसोबत दिनांक २५-४-२०१२ रोजीच्या करारनुसार सदरील कर्ज मिळणेकरीता केलेल्या कराराच्या अटी/शर्तीनुसार आय.डी.बी.आय बँकेकडून कर्ज उभारणीच्या कार्यवाही अंतर्गत प्रस्तावात नमुद केलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या मिळकती आय.डी.बी.आय.बँकेकडे तारण ठेवण्यास व त्या संबंधीची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७४०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्ह्यातील श्रीक्षेत्र वेरुळ हे १२ ज्योतिलिंगापैकी १२ वे स्थान आहे. येथे दरवर्षी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. सदरील यात्रेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून व औरंगाबाद शहरातून फार मोठ्या प्रमाणात नागरीक जात असतात.

याबाबींचा विचार करुन श्रीक्षेत्र वेरुळ, घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून महाशिवरात्री च्या दिवशी दि.१६.०२.२०१५ च्या मध्यरात्री पासून ते दि.१७.०२.२०१५ च्या मध्यरात्री पर्यंत औरंगाबाद महानगरपालिके मार्फत अग्निशामक दलाची गाडी दरवर्षी प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्रीमती साधना गणेश सुरडकर.

**अनुमोदक:-** श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीक्षेत्र वेरुळ, घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून महाशिवरात्री च्या दिवशी दि.१६.०२.२०१५ च्या मध्यरात्री पासून ते दि.१७.०२.२०१५ च्या मध्यरात्री पर्यंत औरंगाबाद महानगरपालिके मार्फत अग्निशामक दलाची गाडी उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करुन प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास काम करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील वार्ड फ स्पिल नविन खडी रस्ते शहरी भाग अ.क्र.०२ वार्ड क्र.८८ अंतर्गत मुस्तफाबाद येथील १२ मि. विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे. र.रु.२३.०० लक्ष. | ०१. वार्ड क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी व्हाईट टॅपींग रस्ते तयार करणे. र.रु.२३.०० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती साधना गणेश सुरडकर.

**अनुमोदक:-** श्रीमती उर्मीला नितीन चित्ते, श्री.बबन पंडीतराव नरवडे.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-२०१५च्या अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील वार्ड फ स्पिल नविन खडी रस्ते शहरी भाग अ.क्र.०२ वार्ड क्र.८८ अंतर्गत मुस्तफाबाद येथील १२ मि. विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे. र.रु.२३.०० लक्ष. | ०१. वार्ड क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी व्हाईट टॅपींग रस्ते तयार करणे. र.रु.२३.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रेल्वेस्टेशन औरंगाबाद कडून बसस्टँडकडे जाणाऱ्या महावीर चौक या रस्त्यावर उड्डाणपुलाचे बांधकाम चालू आहे. याच पुलाला संपूर्ण विश्वाला शांती व अहिंसाचे संदेश देणारे भगवान महावीर यांचे नाव देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.प्रशांत सुभाष देसरडा, संजय किसनराव केनेकर, श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत.

**अनुमोदक:-** श्री.महेश शिवाजीराव माळवतकर, श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण, अनिल श्रीकिसन मकरिये.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन औरंगाबाद कडून बसस्टँडकडे जाणाऱ्या महावीर चौक या रस्त्यावर बांधण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाला भगवान महावीर यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८५ गारखेडा येथील अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड-फ स्पील १२९ व्यापारी संकुल इमारती अ.क्र-१ वार्ड ८५ अंतर्गत मेहरनगर येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे. रक्कम रु.४.०० लक्ष. | ०१. जवाहरनगर पोलिस स्टेशनच्या चौकातुन मल्हार चौकाकडे जाणारा तसेच सुतगिरणी चौकातून काबरानगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर स्वागत कमान बसविणे. रक्कम रु.४.०० लक्ष. |

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर. **अनुमोदक:-** श्री.मनिष चंद्रकांत दहीहंडे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८५ गारखेडा येथील अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड-फ स्पील १२९ व्यापारी संकुल इमारती अ.क्र-१ वार्ड ८५ अंतर्गत मेहरनगर येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे. रक्कम रु.४.०० लक्ष. | ०१. जवाहरनगर पोलिस स्टेशनच्या चौकातुन मल्हार चौकाकडे जाणारा तसेच सुतगिरणी चौकातून काबरानगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर स्वागत कमान बसविणे. रक्कम रु.४.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७४४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत इंदिरानगर पुर्व येथील मनपाच्या खुल्या जागेवर रमाबाई आंबेडकर सामाजिक सभागृह बांधण्यात यावे व त्या करीता आर्थिक तरतुद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर. **अनुमोदक:-** श्री.मनिष चंद्रकांत दहीहंडे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत इंदिरानगर पुर्व येथील मनपाच्या खुल्या जागेवर रमाबाई आंबेडकर सामाजिक सभागृह बांधण्यास व त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा:-</u>**

मा.महापौर :आरोग्य विभागाचा २० जानेवारी २०१५ रोजीचा ठराव क्रमांक ७०५ नुसार समिती नेमण्यात आलेली होती समितीचा अहवाल आलेला आहे त्यानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद